# शिक्षणाची 'शाळा'



संजय टाकळगव्हाणकर

# शिक्षणाची ‘शाळा’

संजय टाकळगव्हाणकर

निर्मल प्रकाशन, नांदेड

निर्मल प्रकाशन : ७८५

ISBN No. 978 - 93 - 92327 - 66 -7

**शिक्षणाची 'शाळा'**
संजय टाकळगव्हाणकर
Mob.: 9822734281
नवा मोंढा, हिंगोली
tasanjay201@gmail.com

**Shikshnachi 'Shala'**
Sanjay Takalgavankar
Mob.: 9822734281
Nava Mondha, Hingoli
tasanjay201@gmail.com

**प्रकाशक**
निर्मलकुमार सूर्यवंशी,
**निर्मल प्रकाशन,**
'कृष्णाई', नरहर कुरुंदकर मार्ग,
कैलासनगर, नांदेड – ४३१६०५
मो. ९४२२८७०३९३

**Published by**
Nirmalkumar Suryawanshi
**Nirmal Prakashan**
Narhar kurundkar Marg,
Kailas Nagar, Nanded-431605
prakashannirmal@gmail.com

**मुद्रक**
आर्टी ऑफसेट प्रिंटर्स, लातूर

**Printing Press** :
Arty Offset Printers, Latur

**आवृत्ती**
दि. ०८ फेब्रुवारी २०२४

**Edition**
08 Febuary 2024

**© सर्व हक्क**
सौ. अरुणा संजय टाकळगव्हाणकर

**Copyright © 2024**
**Mrs. Aruna Sanjay Takalgavankar**

**मुखपृष्ठ**
संतोष घोंगडे

**Cover**
Santosh Ghongde

**अक्षरजुळवणी व मांडणी**
सृजन कम्युनिकेशन्स,
८/९ पहिला माळा, खंडेलवाल प्लाझा,
वजिराबाद, नांदेड
मो.: ९४२२१७०६२३

**Type Setting & Layout**
Srujan Communications,
8/9 First Mala Khandelval
Plaza Vazirabad, Nanded
Mob.: 9422170623

**किंमत रू. १२०/-**

Price Rs. 120/-

# शिक्षणाची शाळा

हा शिक्षणक्षेत्रावरील लेखांचा संग्रह ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना ई स्वरुपात विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान लेखक श्री संजय टाकळगव्हाणकर यांचे आभारी आहे.

या पुस्तकाचे ई प्रकाशन व विनामूल्य वितरण करण्यास परवानगी दिल्याबद्दल आम्ही निर्मल प्रकाशन, नांदेड यांचे आभारी आहोत.

या पुस्तकावरील आपले अभिप्राय श्री संजय टाकळगव्हाणकर यांना 9822734281 या क्रमांकावर कळवावे.


धन्यवाद

सुनीळ सामंत
टीम ई साहित्य
esahity@gmail.com
www.esahity.com
Whatsapp: 99877 37237

ई प्रकाशन तिथी- दहा जून दोनहजार चौवीस




**डॉ. जयनारायण मंत्री**



**भ.मा. परसवाळे**



**प्रा. विलास वैद्य**



**कुंडलिक निर्मले**



**डॉ. विलास ढवळे**

माझ्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयनारायण मंत्री व मराठी विषयाचे प्राध्यापक विलास वैद्य यांच्या मार्गदर्शनाच्या प्रेरणेने माझ्यातील लेखक जागा झाला. तसेच जेष्ठ चित्रकार तथा कवी माझे गुरुबंधू असे भ.मा. परसवाळे सरांनी माझ्या जडणघडणीला एक यथार्थ दिशा दिली. यासह माझे बालवयातील शिक्षक कुंडलिक निर्मले गुरुजींनी मला खऱ्या अर्थाने अभ्यासाकडे वळवले. तसेच माझ्या पत्रकारितेच्या काळापासून मला सातत्याने मार्गदर्शन करणारे डॉ. विलास ढवळे यांच्यामुळे मी विविध विषयांवर लिखाण करू शकलो. या सर्वांनी माझ्यातील लेखकाला घडवण्याचे काम केले म्हणून यांना हे पुस्तक समर्पित करीत आहे.

## अनुक्रमणिका


१. मनोगत .......... ५

२. शिक्षणाचा काळा बाजार .......... १६

३. गुलामगिरीकडून गुलामगिरीकडे..! .......... १९

४. राष्ट्रीय शिक्षण धोरण हवे .......... २१

५. शिक्षणक्षेत्रात राजकीय वादळ .......... २४

६. शाळांच्या विशेष पटपडताळणी नंतर आता सर्वच क्षेत्रांचे मूल्यांकन करावे .......... २७

७. अधिकाऱ्यांच्या हुकूमशाहीला लगाम .......... ३०

८. कोरोनाच्या आड बालकाच्या शिक्षण हक्कावर गदा. गुरुकुल, मेकॉले ते स्वयंअर्थसहाय्यित शिक्षण व्यवस्था .......... ३३

९. जागतिक ऑनलाईन व डिजीटल कंपन्यांच्या दबावाला बळी पडून प्रचलित शिक्षण व्यवस्था उद्‌ध्वस्त करण्याचे षडयंत्र .......... ३७

१०. शिक्षण खात्यात येतेय 'वाझे' प्रवृत्ती! .......... ४०

११. प्रतिभावंत आंतरराष्ट्रीय शिक्षक आणि कुच्चर अधिकारी .... ४५

१२. शासनाकडूनच शिक्षणाची 'शाळा' .......... ४९

१३. बालहक्क कायद्याची दशा आणि दिशा .......... ५३

१४. आव ग्लोबल शिक्षणाचा, अंमलबजावणी संकुचित विचारांची .......... ५७

१५. शिक्षण प्रेरणा परीक्षा घ्या! .......... ६१

# मनोगत

**गेल्या** तीन दशकापासून वेगवेगळ्या वृत्तपत्रांमध्ये शिक्षण विषयक लिखाण केलेले लेख संग्रहित करून हे पुस्तक रूपात आणण्याचे प्रयोजन आहे. मानवी जीवनाच्या इतिहासात शिक्षणाला फार महत्त्व आहे. एक सुसंस्कृत व विवेकवादी समाज निर्मितीत शिक्षणाची मोठी भूमिका असते. शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. भारतीय प्राचीन इतिहासातून असे आपणास निदर्शनास येते की शिक्षणासाठीचा संघर्ष खूप मोठा आहे. मूठभरांचे शिक्षण बहुजनापर्यंत येण्यासाठी त्या त्या काळातील महात्म्यांनी व थोर स्त्री–पुरुषांनी अनंत यातना सोसल्या. शिक्षणाचा हा प्रवास बहुजनांसाठी खडतरच होता व आजही आहे. याच्या प्राचीन इतिहासात न जाता भारतात इंग्रजांची सत्ता स्थापन झाल्यानंतर मेकॉलेची शिक्षण पद्धत ही इंग्रजी सत्ता अबाधित ठेवण्यासाठी होती. या शिक्षण व्यवस्थेने भारतातील गुरुकुल शिक्षण व्यवस्था मोडीत काढली. पुढे शिक्षणातील स्थित्यंतरे होतच राहिली. असे असले तरी कोणतीही शिक्षण व्यवस्था असो या शिक्षण व्यवस्थेवर ताबा हा प्रथम समाजातील उच्चजातीने मिळवला. इंग्रजांच्या काळात, राजेशाहीच्या काळात प्रशासनातील अधिकारी यांनी इंग्रजांची चाकरी करण्यासाठी संघटितपणे प्रयत्न करून विशिष्ट जाती व वर्गासाठी शिक्षणाचा हक्क मिळवून घेतला. सदर पुस्तक वाचकांच्या हाती देतांना या ठिकाणी प्रत्येक लेखाची पार्श्वभूमी व त्यावेळची परिस्थिती ही लक्षात आल्याशिवाय पुस्तकातील लेखाचे प्रयोजन समजणार नाही. त्यामुळे मनोगत हे दीर्घ झाले आहे.

महाराष्ट्राचा विचार केला तर महात्मा ज्योतिराव फुलेंनी सर्वप्रथम बहुजनांच्या शिक्षणाच्या हक्कासाठी लढा उभारला. त्यासाठी संघर्ष केला व इंग्रजांकडून शिक्षणाचा अधिकार मिळवला. महात्मा फुलेंमुळेच बहुजन समाज दीनदलित व स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली झाली. पुढे महात्मा फुलेंचा हा वारसा छत्रपती

शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख यांनी पुढे नेत शिक्षण चळवळीचा पाया भक्कम केला. स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतरही बहुजनांची शिक्षण चळवळ सुरू होती. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर त्यावेळच्या राज्यकर्त्यांवर या चळवळीच्या विचारांचा पगडा होता व त्या विचारांची कळवळ होती आणि त्यातूनच शासनाने स्थानिक स्वराज्य संस्था बरोबरच शासन अनुदानित शाळा व महाविद्यालयांना अनुदान देऊन शाळा काढण्यासाठी प्रोत्साहित केले. त्या वेळच्या राज्यकर्त्यांच्या या धोरणामुळेच आज खेडोपाडी वाडी तांड्यावर दुर्गम भागात शाळा दिसतात. हे पुरोगामी महाराष्ट्राचे एक वैशिष्ट्य आहे. मुठभरांची शिक्षणातील मक्तेदारी बहुजनांकडे आली म्हणजे शैक्षणिक क्रांती झाली नाही, परंतु त्यातही अपप्रवृत्ती शिरल्या आणि शिक्षणातील संघर्ष हा कायम राहिला. शिक्षणाचा मूळ उद्देश कालांतराने बाजूला पडला.

या तीस वर्षाच्या एकंदरीत शिक्षण व्यवस्थेतील जे प्रमुख घटक आहेत यावर सकारात्मक व नकारात्मक विचाराबरोबरच वास्तववादी लिखाणाची भूमिका राहिलेली आहे.

या पुस्तकातील प्रथम लेख 'शिक्षणाचा काळाबाजार' हा जर पाहिला तर आपणास असे दिसून येईल की १९९० च्या दशकाच्या प्रारंभापासूनच राजकीय नेते व कार्यकर्ते यांनी शासनाच्या अनुदानित धोरणाचा लाभ घेऊन खेडोपाडी मोठ्या प्रमाणावर शाळा महाविद्यालय उघडले. त्याचा परिणाम असा झाला की, शहरातील शाळा व महाविद्यालयात ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांचा लोंढा कमी झाला. प्रस्थापित उच्च वर्गीय समाजाने स्थापन केलेल्या शाळा व महाविद्यालय थोडेसे अडगळीस पडू लागली. मग ग्रामीण भागातील शाळा व महाविद्यालयात गुणवत्ता नाही व ह्या शाळा, महाविद्यालये म्हणजे राजकीय पुढाऱ्यांच्या दुकानदाऱ्या आहेत. त्या शाळेतील व महाविद्यालयातील परीक्षा केंद्र म्हणजे कॉपी केंद्र आहे. असा प्रचार प्रस्थापित शहरी समाजातून करण्यात येऊ लागला. यात काही प्रमाणात तथ्यही असू शकते. परंतु सरसकट असं नव्हतं. ग्रामीण भागातील परीक्षा केंद्रामध्ये पास होण्यापुरती विद्यार्थ्यांना नकला करण्याची सवलत असेल, परंतु त्यावेळच्या प्रस्थापित व उच्च विद्याविभूषित संचालक असलेल्या शाळा महाविद्यालयामध्ये केवळ उत्तीर्ण होण्यासाठी नव्हे

तर मेरिट मध्ये पास होण्यासाठी, घरून पेपर सोडवण्याची मुभा होती आणि त्याचे रेट ही ठरलेले होते. हे त्यावेळचे वास्तव आहे. या १९९० च्या दशकात शासनाकडून अनुदानित शाळा व महाविद्यालयांना मिळत असलेल्या अनुदानाचा पैसा पाहून अनेक लोभी, धंदेवाईक संस्थाचालकांनी शिक्षण क्षेत्रात कधी प्रवेश केला हे कळालेच नाही आणि ज्ञानाची ही केंद्रे आर्थिक शोषणाची केंद्रे झाली. त्यानंतर आर्थिक शोषणाच्या नवनवीन घटना उजेडात येऊ लागल्या. संस्थाचालक विरुद्ध शिक्षक कर्मचारी असा संघर्ष पेटला आणि ज्ञान केंद्रात हाणामारी, खुनासारख्या घटना घडू लागल्या. संस्थाचालक हे बहुजनांचे आणि शिक्षक कर्मचारीही बहुजनांचे तरीपण महाराष्ट्रातील बऱ्याच शाळा महाविद्यालयात हा संघर्ष पहायला मिळाला. शिक्षणातील या अपप्रवृत्ती विरुद्ध 'शिक्षण: विकासाकडून गुन्हेगारीकडे' हा विशेष अंक १९९९ ला काढला. या अंकाबाबत शिक्षण क्षेत्रातील कुलगुरू, विचारवंत, प्राचार्य व प्रामाणिक संस्थाचालक यांनी लेखी रूपात आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. या विषयी संपादकीय 'गुलामगिरीकडून गुलामगिरीकडे', यातून त्यावेळची शिक्षणक्षेत्रातील या शोषणाची भीषणता आपल्या लक्षात येईल. सन २००९ मध्ये बालकाच्या सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या हक्काचा कायदा केंद्र शासनाने पारित केला. प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे केले पण जिल्हा परिषद व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेतील शिक्षकांची कमतरता, शाळेच्या इमारतीची दुरावस्था, यामुळे सक्तीचे व मोफत शिक्षण बालकाला मिळाले परंतु शिक्षणातील समानता सर्वांना समान गुणवत्तापूर्व शिक्षण हे ध्येय साध्य झाले नाही. आणि पुन्हा श्रीमंत व गरीब मुलांना भेदभावपूर्ण शिक्षण म्हणजे पुन्हा चातुर्वर्ण्य शिक्षण व्यवस्था निर्माण झाली. म्हणून राष्ट्रीय शिक्षण धोरण हवे. पण त्यात श्रीमंता पासून गरिबांच्या मुलांना एकच अभ्यासक्रम व गुणवत्तापूर्वक शिक्षण मिळणे हेच धोरण शासनाचे असायला पाहिजे अशी भूमिका मांडली आहे. जिल्हा परिषद व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या, गुणवत्ते अभावी कमी होत आहे अशी धारणा त्यावेळच्या राज्यकर्त्यांची झाली. सन २००६ मध्ये तत्कालीन शिक्षण मंत्री वसंत पुरके यांनी गुणवत्ता विकास कार्यक्रमांतर्गत पायाभूत चाचणीचा उपक्रम शासनाच्या जिल्हा परिषदेच्या व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेतून राबवावा असे आदेश काढले. जेव्हा हा कार्यक्रम खाजगी अनुदानित शाळांना लागू करण्याचे आदेश

दिले आणि या चाचण्या समर्थनार्थ व विरोधात आंदोलन उभे राहिले. त्यावेळचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी यात हस्तक्षेप करून शिक्षण मंत्र्यांचे आदेश मागे घेतले. शिक्षण क्षेत्रातील राजकीय वादळात त्यावेळच्या जिल्हा परिषद व अनुदानित शाळेची परिस्थिती यांचे सत्य मांडण्याचा प्रयत्न केला आहे. सन २०११ मध्ये नांदेड जिल्ह्यातील काही अनुदानित शाळा तपासल्यानंतर असं निदर्शनास आले होते की एका शाळेत असलेले काही विद्यार्थी हे इतरही दोन-तीन शाळेचे विद्यार्थी आहेत. असे बोगस विद्यार्थी दाखवून शालेय पोषण आहार व शिक्षक कर्मचाऱ्यांची संच मान्यता वाढवून बोगस शिक्षक भरतीच्या माध्यमातून शासनाच्या निधीची लूट केली जात आहे. अशा काही मोजक्या शाळा आढळल्या. मग त्या वेळेच्या जिल्हा प्रशासनाने एकाच वेळी महसूल खात्याच्या मार्फत जिल्ह्यातील शाळांची पटपडताळणी केली आणि हा 'नांदेड पॅटर्न' राज्यात प्रसिद्ध झाला. राज्यकर्त्यांची, शासनाची अशी धारणा झाली की, शिक्षण विभागांमध्ये मोठ्या प्रमाणात बोगस विद्यार्थी दाखवून शासनाच्या तिजोरीवर दरोडा घातला जातो म्हणून तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी राज्यातील सर्व खाजगी अनुदानित शाळांची विशेष पडताळणी मोहीम महसूल खात्यामार्फत दिनांक ०३ व ०५ ऑक्टोबर २०११ यादरम्यान राबवली. या मोहिमेच्या अहवालातून राज्यातील केवळ सरासरी १५ टक्के विद्यार्थी या पडताळणीच्या दिवशी अनुपस्थित असल्याचे आढळून आले. विशेष पडताळणी दिवशी सर्व विद्यार्थी उपस्थित राहण्यासाठी राज्यातील शिक्षक मंडळी कधी नव्हे इतक्या प्रमाणात विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष घरी गेले या पडताळणीच्या निमित्ताने वाड्या, तांड्यावरच्या गरिबीचे विदारक चित्र गुरुजींना पाहायला मिळाले ही एक चांगली बाब झाली. परंतु ज्या पद्धतीने बोगस विद्यार्थ्यांचा प्रोपोगंडा करण्यात आला होता त्यातून फारसे काही साध्य झाले नाही. केवळ शिक्षण खात्यातच भ्रष्टाचार होतो असे नाही. तर सार्वजनिक बांधकाम विभाग, रस्ते विकास, महसुल, पाटबंधारे व इतर विभागात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात आहे मग भ्रष्टाचार केवळ 'शिक्षण खात्यातच' आहे का ? आणि त्यातल्या त्यात शाळेमध्येच आहे ? असे कसे असू शकते. एकंदरीत राज्याच्या व राष्ट्राच्या प्रगतीमध्ये सर्व विभागाचा सहभाग असतो म्हणून शाळांची जशी विशेष पटपडताळणी केली त्याच पद्धतीने इतर विभागांचीही विशेष तपासणी करावी व या मोहिमेमध्ये शिक्षकालाही सामावून

घ्यावे असे अनावृत पत्र मुख्याध्यापक या नात्याने मुख्यमंत्र्यांना पाठवण्यात आले होते.

देशाच्या व राज्याच्या एकंदरीत प्रगतीमध्ये कायदेमंडळाने जे ध्येय धोरण ठरवले आहे त्याची अंमलबजावणी करण्याचे काम नोकरशाहीचे असते परंतु सर्वच विभागातील अपवाद अधिकारी वर्ग वगळता त्यांना समाजाविषयी फारसे काही घेणेदेणे नसते त्यामुळेच अंमलबजावणीच्या स्तरावर सर्वच योजना पूर्णत्वाकडे जात नाहीत. नोकरशाहीवर राज्यकर्त्यांचा वचक असणारे नेतृत्व फार कमी आहे. शिक्षण खात्यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये अधिकारांचा गैरवापर करून शैक्षणिक कार्यात चांगले काम करणाऱ्या संस्थावर हे अधिकारी काही नियमावर बोट ठेवून कारवाई करतात त्यामुळे अनेक न्यायालयीन प्रकरणे उद्भवतात. त्यावर वचक म्हणून अलीकडल्या काळात देवेंद्र फडवणीस मुख्यमंत्री असताना सन् २०१७ मध्ये शिक्षण खात्यातील अधिकाऱ्यांनी शाळेच्या भेटी व तपासणी दरम्यान 'अधिकार शाही' बाजूला ठेवून सकारात्मक दृष्टिकोनातून व शाळेतील त्रूटी दूर करण्यासंदर्भात शाळा प्रशासनाला व शिक्षकांना संधी द्यावी असा अध्यादेश काढला आणि त्यामुळे त्या काळात याचा सकारात्मक परिणाम झाला अधिकाऱ्यांच्या हुकूमशाहीला लगाम बसला या स्वरूपाचा लेख आहे.

सन २०१९ मध्ये कोरोना जागतिक महामारीचे भय उभे करून सुमारे एक ते दीड वर्ष शाळा, महाविद्यालय बंद ठेवले गेले. शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील प्रत्यक्ष अध्यापन व अध्ययन ज्ञानार्जनाची शेकडो वर्षाची परंपरा खंडित ठेवून ऑनलाईन शिक्षणाचा घाट जगभरातील त्या त्या देशातील राज्यकर्ते, माहिती व तंत्रज्ञान आणि ऑनलाइन क्षेत्रातील बड्या उद्योगपतींच्या दबावाला बळी पडून ऑनलाईन शिक्षणाची व्यवस्था आणू पाहत होते. राज्यकर्त्यांच्या प्रचारांच्या सभा व इतर सर्व शासकीय कामे, बांधकामे या कोविड महामारीत सुरू होते परंतु शाळा सुरू करतो म्हटले की कोरोना महामारीचे भय दाखवून शाळा दीड वर्ष बंद पाडल्या. याचा दूरगामी परिणाम नंतर कळून चुकेलच. युनेस्कोने बालकाच्या 'शिक्षणाचा' मूलभूत हक्कात समावेश करताना कोणत्याही मानवनिर्मित अथवा नैसर्गिक संकटात बालकांच्या शिक्षणामध्ये खंड पडणार नाही असा कायदा केलेला असताना डिजिटल कंपन्या, ऑनलाइन कंपन्यांच्या दबावाला बळी पडून शिक्षणाचा खेळ खंडोबा या काळात केला. शिक्षण व्यवस्थेतील स्थित्यंतरे

पूर्वार्ध व उत्तरार्धात हे लेख लिहिले आहेत. शिक्षक व समाजाने येणाऱ्या बदलत्या माहिती व तंत्रज्ञान युगाचा वेध घेतला नाही तर विद्यमान शिक्षण व्यवस्था उध्वस्त होईल असा इशारा या लेखातून दिला आहे.

अलीकडे शिक्षण खात्यातील भ्रष्ट अधिकाऱ्यांची साखळी व त्या अधिकाऱ्यांची मंत्र्यांशी असलेले 'अर्थपूर्ण' संबंध याचे एक प्रतिनिधिक स्वरूपाचे उदाहरण म्हणजे आमच्या शाळेसंबंधीची एक घटना. तीन दशकांपेक्षा अधिक हिंगोलीच्या ग्रामीण व आदिवासी भागात गुणवत्तापूर्ण कार्य करणाऱ्या शिक्षण संस्थेच्या शाळेतील शिक्षक कर्मचारी व विद्यार्थ्यांना ही भ्रष्ट लॉबी कशी छळते. अधिकाऱ्यांपासून मंत्र्यापर्यंत शिक्षणाशी काही घेणे देणे नाही असा हा प्रकार आहे. आमच्या शाळेत कार्यरत नसलेल्या एका शिक्षकाचे वेतन काढावे म्हणून शिक्षण अधिकारी दबाव आणतात, खोटे अहवाल तयार करून शाळेच्या शिक्षक कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर अनुदान रोखतात. एवढं करून बेकायदेशीर कामास जुमानत नसल्यामुळे शाळेवर प्रशासक नेमण्याची कारवाई करतात. यानंतर शिक्षणसंचालक प्रशासक नेमण्याचे आदेश देतात आणि या आदेशाविरुद्ध त्यावेळच्या शिक्षणमंत्री वर्षाताई गायकवाड यांच्याकडे सुनावणी होते. याचीही विदारक अशी कहाणी आहे. सारे जग कोरोना जागतिक महामारीच्या संकटात असताना लॉकडाऊन होते. संचारास प्रतिबंध असताना प्रत्यक्ष शासनाच्या कोणत्याच बैठका व सुनावणी घेण्यास शासनानेच निर्बंध घातलेले असताना शिक्षणमंत्री वर्षाताई गायकवाड यांनी लॉकडाऊनच्या काळामध्ये प्रशासकाच्या अपिलावर सुनावणी घेण्यासाठी तीन वेळा मुंबईला मंत्रालयात बोलवतात आणि नंतर ऑनलाईन सुनावणी घेऊन अधिकाऱ्यांच्या चुकीच्या आणि बेकायदेशीर कृत्यावर स्वत:चे मत न नोंदवता प्रशासक ठेवण्याचा आदेश कायम करतात. शिक्षणमंत्र्याच्या या आदेशास मा. उच्च न्यायालय तात्काळ स्थगिती देते. यावरूनच शिक्षणमंत्र्यांचे आदेश किती नियमाला व कायद्याला धरून होते हे दिसून येते. मंत्र्यांची बांधीलकी ही विद्यार्थी व शिक्षकांशी आहे की भ्रष्ट अधिकाऱ्याशी ? एका खून प्रकरणातील आरोपी असलेल्या सचिन वाझेला पूर्वपदावर कायम ठेवून गृहमंत्र्याना तुरुंगवासात जावं लागतं. त्यामुळे महाराष्ट्राची कधी नव्हे एवढी बदनामी होते. व हे प्रकरण ताजे असतानाच ज्या अधिकाऱ्यांनी दोन-तीन वर्ष ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण काम करणाऱ्या शाळेतील शिक्षक

कर्मचाऱ्यांचे आर्थिक व मानसिक छळ करणे ही कधीच न भरून येणारी बाब आहे. महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळ ही पुरोगामी आहे. स्वत:च्या पत्नीचे मंगळसूत्र गहाण ठेवून शाळा चालविणाऱ्या कर्मवीरांची ही भूमी आहे. असे असताना भ्रष्ट अधिकाऱ्यांना पाठीशी घालून महाराष्ट्राच्या शैक्षणिक चळवळीचे तालिबानीकरण करण्याचे काम या एकंदरीत घटनेतून स्पष्ट होते. त्यामुळे मुख्यमंत्र्यांना मुख्याध्यापकांनी खुले पत्र देऊन 'शिक्षण खात्यात येते आहे वाझे प्रवृत्ती !' असा सावधतेचा इशारा या पत्रातून दिला.

कोविड काळात सुमारे दीड वर्ष शाळा बंद राहिल्या. ऑनलाईन शिक्षणातील दोष समोर येऊ लागले. ग्रामीण भागातील पालकांना आपल्या परिसरातील शाळेचे महत्त्व कळू लागले. कोविड काळात बऱ्याचशा जिल्हा परिषद व अनुदानित शाळेतील शिक्षकांनी घरोघरी जाऊन विद्यार्थ्यांना शिकवले याचा परिणाम दिसू लागला. ग्रामीण भागातील आपल्या परिसरातील शाळेत विद्यार्थी पाठवा ही मानसिकता पालकांची बदलली. एरवी जिल्हा परिषद व अनुदानित शाळेत काय पडले आहे ? इंग्रजी शाळेचे शिक्षणच खरे शिक्षण हे ग्रामीण भागापर्यंत लोन पसरलं होते. ते कोविड निमित्ताने थोड्या काही प्रमाणात ते दूर झाले. शिक्षकाची प्रतिमा उजळण्यासाठी या संधीचा फायदा झाला. शिक्षकांनी केवळ गुगल गुरुजी प्रमाणे माहिती देऊन चालणार नाही तर 'गुरु' होऊन विवेक व बुद्धिवादी होऊन कार्य केल्यास ही शिक्षण व्यवस्था टिकून राहील अन्यथा एका इंजिनाच्या शोधामुळे गावातील बारा बलुतेदार पद्धत नष्ट झाली त्याचप्रमाणे इंटरनेट व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकाला शिक्षण व्यवस्थेतून हद्दपार व्हायचे नसेल तर 'ज्ञानवंत व्हा' असा संदेश शासनाकडून शिक्षणाची 'शाळा' होते या लेखातून दिला.

आपली शिक्षण व्यवस्था किती बरबटलेली आहे. प्रामाणिक गुणवंत व प्रतिभावंत शिक्षकांना ही व्यवस्था कशी छळते याचे उदाहरण म्हणजे पुणे जिल्ह्यातील वाबळेवाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेला शासनाच्या अर्थसहाय्यविना जागतिक नामांकन प्राप्त करून देणारे दत्तात्रय वारे गुरुजी व अध्यापनामध्ये क्यू आरकोडच्या माध्यमातून माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करणारे रणजीत सिंग डीसले गुरुजी यांना जागतिक स्तरावरील ग्लोबल टीचर या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले अशा या जिल्हा परिषदेच्या शिक्षकांनी

जागतिक स्तरावर महाराष्ट्राचीच नव्हे तर देशाची शान वाढवली अशा शिक्षकांना शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी कसे छळले हे सर्वांनाच माहित आहे. परंतु त्यांच्यावर अन्याय होत असताना कोणताही राजकीय नेता, पक्ष, शिक्षक संघटना व पालक वर्ग समोर आला नाही. अशा प्रतिभावान व गुणवान शिक्षकांचे या व्यवस्थेमध्ये असे हाल होत असतील तर जागतिक स्तरावरील शिक्षणाच्या ज्या स्पर्धा आहेत त्यामध्ये आपल्या शाळा कशा टिकणार यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न 'प्रतिभावंत आंतरराष्ट्रीय शिक्षक आणि कुच्चर अधिकारी' या लेखातून केला.

'बालहक्क कायद्याची दिशा व दशा' या लेखातून 'सेव्ह द चिल्ड्रन' संयुक्त राष्ट्राच्या या घोषणा पत्रावर १९३१ ला महात्मा गांधींनी स्वाक्षरी केली. भारतीय राज्यघटनेमध्ये १९५० ला बालकांच्या हक्का संदर्भात कायदा केला. परंतु प्रत्यक्षात भारतीय राज्यघटना अस्तित्वात आल्यानंतर तब्बल पन्नास वर्षानंतर बालकांच्या शिक्षणाचा मुलभूत व सक्तीचा शिक्षणाचा कायदा अस्तित्वात आला. बालकाच्या हक्काच्या अनुषंगाने २५० कायदे सध्या अस्तित्वात आहेत. परंतु त्यांची अंमलबजावणी होत नाही. देशात जन्मलेला प्रत्येक बालक हे आपण राष्ट्रीय संपत्ती म्हणून पाहत नाही तोपर्यंत देश प्रगतिशील होणार नाही असे मत या लेखातून मांडण्याचा प्रयत्न आहे.

'नवीन शैक्षणिक धोरण २०२०' या अनुषंगाने लिहिलेल्या लेखामध्ये नवीन शैक्षणिक धोरण हे क्रांतिकारक व जागतिक स्तरावरचे आहे तरीपण शासनकर्ते व अंमलबजावणी यंत्रणा आपल्या कृतीतून 'धर्म' या भावनेला बळकटी देत असेल व अभिव्यक्ती स्वातंत्र्यास व वास्तववादी इतिहास डावलून हे धोरण राबवत असेल तर आपली वाटचाल ही मध्ययुगीन काळाकडेच असेल असा इशारा या लेखातून दिला आहे.

शिक्षण क्षेत्र असो की कोणतेही क्षेत्र असो त्या क्षेत्राच्या प्रगतीस व अधोगतीस त्या क्षेत्रातील सर्वच घटक जबाबदार असतात. शिक्षण क्षेत्रातील जिल्हा परिषद व खाजगी अनुदानित शाळेतील गुणवत्ता कमी झाली असे मानले तर यासाठी केवळ शिक्षक जबाबदार नाही. सन् २०२३ मध्ये शिक्षक प्रेरणा परीक्षा ही शिक्षकाची स्वयं मूल्यमापन परीक्षा घेण्याचा घाट मराठवाडा विभागात झाला शिक्षण प्रेरणा परीक्षा घ्या! पण... या लेखात केवळ शिक्षकाचीच परीक्षा न

घेता शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक घटकाची म्हणजेच खालच्या अधिकाऱ्यापासून शिक्षणसंचालक, सचिव व मंत्र्यांची पण परीक्षा घ्या. केवळ शिक्षक म्हणजे नवनवीन प्रयोग करणारी जमात नव्हे. असे खडे बोल या लेखाच्या माध्यमातून मांडले आहेत.

या पुस्तकाच्या माध्यमातून गेल्या तीन दशकातील शिक्षण क्षेत्रातील त्या त्या वेळेची सकारात्मक व नकारात्मक बाजू माझ्या सदविवेकबुद्धीला पटली ते लिहिले आहे. शासनाने जिल्हा परिषदेच्या व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेत गुणवत्ता नाही म्हणून खाजगी अनुदानित शाळांना प्रोत्साहन दिले. त्यानंतर शासनाचे धोरण हे शिक्षणातून शासनाचा सहभाग काढून घेणारे धोरण राहिले आहे. कायम विनाअनुदानित शाळा, स्वयंअर्थसहाय्य शाळा, इंग्रजी शाळा इ. मंजूर करण्याचा धडाका लावला. यासाठी पाहिजे त्या ठिकाणी शाळा उघडा त्यासाठी कोणताही आराखडा नाही. त्यामुळे शिक्षण क्षेत्रामध्ये शाळा–शाळांमध्ये स्पर्धा लागली. सध्या शिक्षणाची अवस्था म्हणजे एक ना धड भाराभर चिंध्या अशी झाली आहे. कशा पद्धतीने जिल्हा परिषद व अनुदानित शाळा हळूहळू बंद पडतील. याचे स्लो पॉयझन दिले जात आहे. अपुरे शिक्षक, कमी वर्ग खोल्या, शाळा विकासासाठी तुटपुंजी रक्कम यावर जिल्हा परिषद व अनुदानित शाळांनी गुणवत्ता टिकवावी अशी त्यांची भाबडी समजूत आहे. शिक्षक भरती जवळजवळ बंद झाली आहे. आज पालकांचाही कल इंग्रजी शाळेकडे असला तरी खुद नीती आयोगाने असे स्पष्ट केले आहे की शासकीय शाळा, अनुदानित शाळा व इंग्रजी शाळा यांच्या गुणवत्ते संदर्भात निती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमिताभ कांत यांनी स्पष्टपणे सांगितले की खाजगी शाळेत गुणवत्तापूर्वक शिक्षण मिळते ही बाब पूर्णत: सत्य नाही हे वास्तव असले तरी आता श्रीमंता पासून ग्रामीण भागातील शेतकरी व मजुरांचा कल हा इंग्रजी शाळेकडे वळला आहे. अशा वेगवेगळ्या गटातील शाळांच्या स्पर्धा जरी असल्या तरी आताच्या माहिती व तंत्रज्ञान, इंटरनेटच्या व कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात विद्यमान शिक्षण व्यवस्था कुठपर्यंत तग धरेल हे आगामी काही वर्षात लक्षात येईलच. शिक्षणाची 'शाळा' हे पुस्तक पूर्णत्वास येण्यासाठी माझे जेष्ठ मित्र शाहू पाटोळे यांनी या पुस्तकास अचुक असे शिर्षक सुचविले. या पुस्तकाचे मुखपृष्ठ अत्यंत समर्पक चित्र सुप्रसिद्ध चित्रकार संतोष घोंगडे यांनी रेखाटले. माझे सहकारी मित्र विठ्ठल

सोळंके, गंगाप्रसाद भिसे यांनी या पुस्तकातल्या तांत्रिक बाबी पुर्ण करण्यासाठी सहाय्य केले. हे पुस्तक निर्मल कुमार सुर्यवंशी यांच्या 'निर्मल' प्रकाशनाने प्रकाशित केले. अक्षर जुळणीचे काम सृजन कम्युनिकेशने पुर्ण केले. या सर्वांचे आभार.

विद्यमान शिक्षण पद्धती व त्या समोरील आव्हाने या अनुषंगाने हे पुस्तक वाचकांच्या सेवेमध्ये सादर करित आहोत.

**– संजय टाकळगव्हाणकर**

संजय टाकळगव्हाणकर हे निर्भयपणे आपली मते मांडणारे एक सत्यान्वेषी लेखक आहेत. या पुस्तकात त्यांनी शिक्षणक्षेत्रातील भ्रष्ट व दिशाशून्य व्यवस्थेची केलेली चिरफाड वाचकाला अस्वस्थ व अंतर्मुख करते. एक नागरिक, कर्मचारी व लेखक म्हणून त्यांच्यात दिसणाऱ्या जागरुकतेबद्दल त्यांचे अभिनंदन!

– **भ.मा. परसवाळे**

# शिक्षणाचा काळाबाजार

**शिक्षणाचा** खरा अर्थ म्हणजे व्यक्तीचा सर्वांगीण विकास करणे हा होय, म्हणजे ज्ञानात्मक, क्रियात्मक व भावनात्मक या तिन्ही अंगांचा विकास पूर्वी शिक्षक, गुरूजी, करायचे. आपल्या शिक्षणाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करून समाजजीवनाला पोषक व राष्ट्राच्या विकासाला जे आवश्यक मूल्य विद्यार्थ्यांच्या अंगी रूजवून राष्ट्राला एक चांगला नागरिक देण्याचा गुरूंचा प्रयत्न असायचा पुढे काळानुरुप शिक्षणाचे संदर्भ बदलले. इंग्रजाच्या आक्रमणानंतर भारतीय शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल झाला. कारकुनी शिक्षण देणे सुरू झाले. पूर्वीच्या आश्रमाची जागा शाळा / महाविद्यालयांनी घेतली नैतिकता, आदर्शवाद हे शिक्षणातून हद्दपार होऊन शिक्षण हे भौतिकवादी ऐहिक झाले. इंग्रजाचा राज्यकारभार सुरळीत चालावा. यासाठी असलेली शिक्षण पद्धती स्वातंत्र्यानंतर ही चालू राहिली. प्रचलित शिक्षण पद्धती ही केवळ व्यक्तीचा बौद्धिक विकास म्हणजे स्मरणाची परीक्षा यावरच भर देत असल्यामुळे सर्व शिक्षण प्रणाली ही परीक्षाकेंद्री झाली आहे. पालक, शिक्षक आदी विद्यार्थ्यांचे यश अपयश हे परीक्षेतील निकालावर गृहीत धरले जाते.

परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करण्यासाठी अभ्यास, परिश्रम, चिकाटी हा एकमेव मार्ग हा यशस्वीतेचा मार्ग आता कालबाह्य होत असल्याचे चित्र परीक्षा केंद्रावर फेरफटका मारल्यानंतर किंवा परीक्षाकालावधीत विद्यार्थ्यांच्या खोलीला भेट दिल्यानंतर जाणवते. सर्वसाधारणत: आपला समज असा असतो की, एक दिवस आधी परीक्षार्थी वर्षभरात झालेल्या अभ्यासक्रमाची उजळणी करण्यात मग्न असतो पण असे चित्र दिसत नाही. अपवाद वगळता जवळ–जवळ सर्वच विद्यार्थी हे झिगझॅग पद्धतीने कॉप्या करण्यात किंवा मायक्रो झेरॉक्स काढण्यात गुंग असतात. एवढेच नाही तर पर्यवेक्षक कोण आहे ? गार्डींगवर

कोण–कोणती प्राध्यापक मंडळी आहे ? पर्यवेक्षकाची मानसिकता ओळखून तो एक पेपरला किती घेतो (पैसे) ‘अगर वो लेता होगा तो उसके साथ आज ‘बार मे बैठेंगे’ अशा एक नाही अनेक विषयांची चर्चा विद्यार्थी परीक्षेच्या कालावधीत करतात व आपआपल्या परीने पर्यवेक्षकांशी, गार्डींगवर असलेल्या प्राध्यापकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करतात हे सर्व पाहिल्यावर आपल्याला ग्लानी येते. परीक्षकाच्या व परीक्षेतील भ्रष्टाचाराच्या सत्यकथा ऐकल्यावर मोठमोठे गुन्हेगार सुद्धा क्षुल्लक वाटू लागतात. माझ्या एका प्राध्यापक मित्राने परीक्षेतील गैरप्रकाराविषयी माहिती देऊन धक्काच दिला. तो असा की, सदरील प्राध्यापक मित्राच्या स्नेह्याचा मुलगा पदवी तृतीय वर्षात शिकत होता. त्याने वर्षभर अभ्यास न होण्याची कारणे सांगून ‘आता दोन दिवसांवर परीक्षा आली, परीक्षा केंद्र आपले कॉलेज नसून आपला नंबर दुसऱ्या महाविद्यालयात आला आता काय करावे ? ‘सर माझे शेवटचे वर्ष आहे. मला मदत करा,’ अशी विनवणी केली. त्यावेळी प्राध्यापकांनी त्यास धीर दिला आणि तुझा नंबर ज्या कॉलेजमध्ये आला आहे. त्या केंद्रावर पर्यवेक्षक माझा मित्र आहे. तो अशा गरजुंना मदत करतो असे सांगितले आणि ते दोघे मिळून त्या मदतगार पर्यवेक्षकाकडे गेले. त्याला साह्य करण्याची विनंती केली. तेव्हा सदरील पर्यवेक्षकाने प्रत्येक बाबीसाठी स्वंतत्र निश्चित केलेले दरपत्रकच सांगितले. या गोष्टी अंचब्यात पाडण्यासारख्या आहेत. ही परीक्षा आहे की, सौदे बाजार ?

विशेषत : हे गैरप्रकार ग्रामीण भागातील महाविद्यालयातून नव्हे तर शहरातील मान्यता पावलेल्या कॉलेजमधून घडतात. या गैरव्यवहारात गुंतलेली मंडळी आमदार, खासदार किंवा मंत्री महोदय किंवा त्याचे नातेवाईक नसतात तर समाजातील उच्चशिक्षित डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक, वकील, अधिकारी असा पांढरपेशा समाज जो आपल्या गुणवत्तेचा, बुद्धिमत्तेचा व प्रामाणिकपणाचा दिंडोरा नेहमी बडवत असतो. ग्रामीण भागात कॉपी करत असल्याबद्दल सर्वजण ओरड करतात. त्यात जरी तथ्य आहे असे गृहीत धरले तरी कॉपी करणारा विद्यार्थी जेमतेम पास (उत्तीर्ण) होऊ शकतो. नापास होणाऱ्या विद्यार्थ्यास पास करणे व्यवहारातील तडजोड म्हणून समजू शकतो. परंतु नापास होणाऱ्या नालायक विद्यार्थ्यांना घरी उत्तर पत्रिका लिहून देण्याची मुभा देऊन उच्चश्रेणीत व गुणवत्तेत उत्तीर्ण करून प्रामाणिक व गुणवंत विद्यार्थ्यांचा न्याय व हक्क

डावलण्याचा गंभीर गुन्हा व पाप ही मंडळी करीत आहे. मग प्रश्न पडतो की, शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात 'परीक्षेच्या' नावाखाली हे किळसवाणे, चीड निर्माण करणारे गैरप्रकार चालतात तेव्हा परीक्षेला इतके महत्व का ?

आज समाजात पदव्यांना इतके महत्व प्राप्त झाले आहे की, पदवी नसलेल्या मुलांना कोणी मुलगी देण्यास धजावत नाही. प्रत्येक व्यक्तीही नोकरी प्राप्त करण्याच्या उद्देशाने शिकत असते. कारण नोकरी मिळाल्यानंतर श्रम करण्याची गरज नाही.

(लोकपत्र ११ मे १९९४)

■■

# गुलामगिरीकडून गुलामगिरीकडे ..!

**एकोणीसाव्या** शतकात बहुजन, दीन पद्दलित समाजाच्या उन्नतीसाठी महात्मा जोतीराव फुलेंनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. एका अविद्येमुळे हा खेळ झाला हे म.फुलेंनी ओळखले होते. बहुजन समाजाचा सर्वांगीण विकास करावयाचा असेल तर शिक्षणाशिवाय दुसरा मार्ग नाही, म्हणून म. फुलेंनी शाळा काढण्यावर भर दिला. पुढें छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा, कृषीभूषण डॉ. पंजाबराव देशमुख यांनी म.फुलेंची परंपरा कायम ठेवली. आज महाराष्ट्रात खेडोपाडी, तांड्या-वाड्यात, दुर्गम डोंगर दऱ्यात खाजगी शिक्षण संस्थेचे जाळे पसरलेले दिसत आहे. ते या महात्म्यांच्या प्रयत्नाचे फलित आहे, पंरतु ज्या उदात्त उद्देशांनी सुधारकांनी शाळा, महाविद्यालये काढली तो उद्देश या भूछत्र्यासारख्या पसरलेल्या शाळांतून साध्य होताना दिसत नाही. उलट ही विद्यालये नवनव्या समस्यांना जन्म देताना दिसत आहेत. शोषणाची, वेठबिगारीची प्रक्रिया या ज्ञानदान केंद्रातूनच सुरु होत आहे. आधुनिक सरंजामशाहीचा उदय या विनाअनुदानित शिक्षण पद्धतीतून होत आहे. वाढती बेकारी, न परवडणारी शेती यामुळे सुशिक्षितांचे लोंढें संस्थाचालकाच्या तावडीत सापडत आहेत, जगण्यासाठी नोकरी, पैश्यासाठी-सत्तेसाठी शाळा ही नवी संकल्पना समाजात रुजली आहे. त्यातूनच शिक्षणक्षेत्रातील भ्रष्टाचाराने रौद्ररुप धारण केले आहे. शिक्षक, कर्मचाऱ्यांचे आर्थिक, मानसिक व शारीरिक शोषणाबरोबरच आता शिक्षकाचे मुडदे पाडण्याचे काम तथाकथित शिक्षण महर्षी करीत आहेत. तेव्हा विद्यार्जनाचे काम या शैक्षणिक संस्थेतून कसे होणार ? भ्रष्ट शिक्षण व्यवस्था व सरंजामशाही मनोवृत्तीतून हिंगोली जिल्ह्यातील खानापूर (चित्ता) येथील विद्यासागर विद्यालयातील तरुण शिक्षक संजय क्षीरसागर यांची हत्या करण्यात आली.

क्षीरसागर यांच्या हत्येच्या एका घटनेतून ग्रामीण शिक्षणाची वाटचाल कोणत्या दिशेला चालू आहे हे दिसून येते. समाज परिवर्तनाचे महान कार्य शिक्षणातूनच होते त्या शैक्षणिक संस्थेतच गुलामगिरीचे पाठ गिरविले जात असतील तर शोषणरहित, उन्नत समाज निर्मितीचे स्वप्न कसे साकार होणार? २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर देशातील प्रस्थापित समाजाने आपली सर्वक्षेत्रात स्वतंत्र व्यवस्था निर्माण केली आहे. उच्चवर्णीय व भांडवलदारांच्या मुलांसाठी कॉन्व्हेन्टमधून आधुनिक शिक्षणाचे धडे दिले जात आहेत. आधुनिक तंत्रज्ञान अवगत करण्यासाठी हा वर्ग वाटेल ती किंमत मोजण्यास तयार आहे. पालक वर्ग कमालीचा जागृत आहे. तर दुसऱ्या बाजूस भारतात (ग्रामीण भागात) शिक्षणाचे चित्र विचित्र दिसत आहे. राजकीय नेते मंडळीची कुरणे असलेल्या शैक्षणिक संस्थातून कालबाहय शिक्षण देण्यात येत आहे. त्यातच शोषणाच्या स्वरुपास गंभीर रूप धारण होत आहे. एक नवा, शोषित समाज निर्माण होत आहे.'इंडिया'तील समाज नव्या (२१व्या) शतकाचे आव्हान स्विकारण्यास सर्वार्थाने सज्ज होत असताना भारतात शोषित समाज नव्या शोषण प्रक्रियेला जन्म देत आहे. त्यामुळे या शैक्षणिक संस्था कमालीच्या बदनाम होत आहेत. सुमारे अडीच हजार वर्षापूर्वी समस्त जगाला मानवतेची व वैज्ञानिक दृष्टी देणाऱ्या म. गौतम बुध्दाच्या धर्माच्या पतनास कारणीभूत त्यांनी निर्माण केलेली विद्यालयेच (बौध्द विहार) ठरली. बुध्दाच्या विद्यालयात अपप्रवृत्तीचा शिरकाव झाला व कालांतराने बुध्दाच्या जन्मभूमीतूनच हा धर्म हद्दपार झाला. हीच परिस्थिती वेगळ्या स्वरुपात आता पुरोगामी महाराष्ट्रात येऊ पाहत आहे. महात्मा फुल्यांनी ज्या कष्टकरी, उपेक्षित समाजाच्या उन्नतीसाठी जीवन संघर्ष केला त्या समाजातच एक प्रस्थापित नवा वर्ग निर्माण होत आहे. महात्मा फुल्यांच्या समकालीन प्रस्थापित समाजाला लाजवेल असा अत्याचार या नव्या वर्गाकडून शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून होत आहे. रोज नित्य नव्या घटना उजेडात येत आहेत. या घटनांकडे आपण वेळीच गांभिर्याने पाहिले नाही व वेळीच याबद्दल जागरुकता दाखवली नाही तर बहुजनांची वाटचाल गुलामगिरीतून गुलामगिरीकडे अशीच राहील याचे भान राजकीय मंडळी व शिक्षणप्रेमींनी ठेवले नाही तर येणारा काळ आपणास कधीच माफ करणार नाही.

(शिक्षण : विकासाकडून गुन्हेगारीकडे विशेष अंक सन-१९९९)

■■

# राष्ट्रीय शिक्षण धोरण हवे

शिक्षणा विषयी महात्मा फुलेंनी १८ व्या शतकात परखड विचार स्पष्ट शब्दात मांडले. भारतीय समाजाचे (बहुजनांचे) वर्षानुवर्षाचे दारिद्र्य व गरीबीत जगणाऱ्या समाजाचे अनर्थ एका अविद्येने कसे केले हे महात्मा फुले यांनी दाखवून दिले.

महात्मा फुलेंनी स्वातंत्र्यापूर्वीच शिक्षणाचे महत्व भारतीय समाजाला त्याचबरोबर त्यावेळच्या इंग्रज शासनाला गोरगरिबांच्या शिक्षणासाठी ध्येय धोरण बदलण्याचे आवाहन केले होते.

स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्य घटनेत सर्व देशातील नागरिकांना समान लेखण्यात आले असले तरी शिक्षण हा विषय उपेक्षित राहिला. देशाच्या एकूण सामाजिक, राजकीय व आर्थिक विकासात शिक्षणाचा महत्वाचा वाटा असतो, हे राज्यकर्ते विसरले. भारतीय समाजाची मूळ शिक्षणाविषयी असलेली संकल्पना दूर्लक्षित करुन त्या-त्या राज्यकर्त्यांनी शिक्षणाविषयी ध्येयधोरणे आखली. निरक्षरता, प्रौढ शिक्षण, सर्वशिक्षा अभियान ह्या योजना जागतिक बँकेच्या अर्थ साह्याने देशातील सर्वसामान्यांच्या हितासाठी राबविण्यात येत असल्याचा कांगावा करण्यात आला. प्रत्यक्षात कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी करुन जे

आर्थिक विषमतेबरोबरच शिक्षणातील विषमता गंभिर स्वरूप प्राप्त करत आहे. अलिकडे जगाची आर्थिक सत्ता म्हणून लक्ष वेधून घेणाऱ्या चीन या देशाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या कायद्यापेक्षा राष्ट्रीय शिक्षा धोरण ठरवून देशातील जन्मलेल्या प्रत्येक बालकास समान शिक्षण मिळायला पाहिजे.

शिक्षणाचा मूळ प्रश्न कायम ठेवण्यात आला. सन २००९-१० साली शिक्षणाचा मूलभूत हक्क कायदा (Right of children to free & compulsary education act 2009) अस्तित्वात आला. शासनस्तरावर ह्या कायद्याबाबत मोठा गाजावाजा करण्यात येत आहे, जणूकाही या कायद्यामुळे गोरगरिबांची, कष्टकरी भारतीयांची मुले प्रस्थापित समाजाच्या मुलांबरोबर शिक्षण घेवू लागतील असे चित्र सर्वत्र निर्माण करण्यात आले आहे. वास्तविक पाहता शिक्षणाच्या हक्काच्या कायद्यामुळे असे होणार आहे का ? या प्रश्नाचे उत्तर निश्चितच नाही.

भारतीय शिक्षण व्यवस्थेकडे आज पाहिले असता ती वर्ण, वर्ग व्यवस्थेत अडकल्याचे दिसून येते. शिक्षणावर शासनाचे संपूर्ण नियंत्रण नाही, शासनाच्या नियंत्रणात असलेले शिक्षण हे कालबाह्य झाले आहे. कालबाह्य शिक्षणावर सक्ती व ते मोफत करणे म्हणजे ते एकप्रकारचे देशातील सर्वसामान्याची कुचेष्टा होय. यासाठी शिक्षणाविषयी शासनाने आजपर्यंत राबवलेल्या योजनांचा आढावा घेतल्यावर शासनाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा किती तकलादू आहे हे कळून चुकेल.

भारतीय समाजातील निरक्षरता, सार्वजनिक प्राथमिक शिक्षण, निरंतर शिक्षण यासाठी स्वातंत्र्यानंतर जागतिक बँकेच्या सहकार्याने अनेक अभियाने राबविण्यात आली. तरीपण देशात निरक्षरतेचे प्रमाण जागतिक तुलनेत अधिक आहे. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्यासाठी सर्वशिक्षा अभियान अलिकडे राबविण्यात आले आहे. तरीपण सन २००६ च्या सर्वेक्षणानुसार ४ ते १४ वयोगटातील ७०.५ लाख मुले शाळाबाह्य असून शाळांमधील प्रत्यक्ष पटनोंदणी (६ ते १४ वर्ष वयोगटातील) १ कोटी ३४ लाख मुले ही शाळाबाह्य आहेत. प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेबाबतीत राष्ट्रीय नियम हा १ किमी परिसरात पहिली ते चौथीपर्यंत शाळा, ३ किमी परिसरात, ५ वी ते ७ वी पर्यंत शाळा अनिवार्य आहे. असे असतांना सर्वशिक्षा अभियान राबवून हे उद्दिष्टे १०० टक्के पूर्ण झाले नाही.

शासनस्तरावर प्राथमिक शिक्षणाच्या अनुषंगाने मूलभूत भौतिक व अन्य सुविधांचाही कोट्यवधी रुपये खर्च करुन स्वातंत्र्याच्या ६३ वर्षांनंतर पूर्ण होऊ

शकले नाही त्या सक्तीच्या कायद्यामुळे काय पूर्ण होणार ?, मूळात राज्यकर्त्यांना राष्ट्राविषयी काही घेणे देणे नाही. राज्यकर्ते प्रथम सत्तेला प्राधान्य देत असून नौकरशाहीवर त्यांचा अंकुश नाही. शिक्षण हे राष्ट्राचे असते, हे राज्यकर्त्यांना कधी कळलेच नाही. शैक्षणिक संस्था ह्या फक्त राजकीय कुरणे असतात हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून शिक्षण निती आखण्यात येते. त्यामुळे आर्थिक विषमतेबरोबरच शिक्षणातील विषमता गंभिर स्वरूप प्राप्त करत आहे. अलिकडे जगाचे आर्थिक सत्ता म्हणून लक्ष वेधून घेणाऱ्या चीन या देशाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या कायद्यापेक्षा राष्ट्रीय शिक्षा धोरण ठरवून देशातील जन्मलेल्या प्रत्येक बालकास शिक्षण मिळायला पाहिजे. खाजगी, विनाअनुदानित अनुदानित, कायम विनाअनुदानित, इंग्रजी, सेमी शासन मान्य शाळा शासनाने ताब्यात घेवून सर्व शाळांमधून एकच अभ्यासक्रम देशपातळीवर जागतिक दर्जाचा बदलत्या संदर्भाने आखावा, तरच देशात खऱ्या अर्थाने शिक्षण हे राष्ट्र उन्नतीचे माध्यम ठरू शकेल.

(दिवाळी अंक लोकपत्र–२०१०)

# शिक्षण क्षेत्रात राजकीय वादळ

**गुणवत्ता** विकास कार्यक्रमांतर्गत पायाभूत चाचण्यावरून महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात अलीकडे राजकीय वादळ उठले आहे. चाचण्यांचे समर्थक व विरोधक हे दोघेही आपणच खरे शिक्षणप्रेमी असल्याचा दावा करीत आहेत. या राजकीय रणकंदनामुळे, शिक्षणाचा महान वारसा लाभलेल्या महाराष्ट्रातील शिक्षणाचा 'पाया' (विद्यार्थी-शिक्षक) ढासळतो की काय, अशी भीती व्यक्त होत आहे.

महाराष्ट्र राज्य हे देशातील एक पुरोगामी राज्य सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक परिवर्तनाचा इतिहास या राज्याला आहे. महात्मा ज्योतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या परिवर्तनाच्या चळवळी देशाच्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्राला मोलाच्या मार्गदर्शक ठरल्या आहेत. स्त्री, दलित बहुजनांच्या शिक्षणासाठी त्यावेळच्या धार्मिक तटबंदी तोडून याच महान राज्यात शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. दुर्दैवाने आज त्याच पुरोगामी महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षणातील गुणवत्तेवरून राजकीय रणकंदन सुरू आहे. जिल्हा परिषद, नगरपालिका इतर स्थानिक स्वराज्य संस्थेतील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी गुणवत्ता विकास कार्यक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना किमान विषयाचे मुलभूत ज्ञान यावे (अक्षर ओळख, गणिताच्या प्राथमिक क्रिया, इंग्रजीचे प्राथमिक ज्ञान इत्यादी) यासाठी पायाभूत, आशय चाचण्या सुरू केल्या होत्या. ग्रामीण विद्यार्थी केंद्रस्थानी ठेवून जिल्हा परिषदेच्या शाळांमधून हा उपक्रम राबविला-जात होता. यावर्षी खासगी संस्थांतील शाळांमधूनही हा उपक्रम राबविण्याला जात होता. निर्णय शिक्षणमंत्री वसंत पुरके यांनी घेतला आणि राज्यात सर्वत्र या चाचण्यासंदर्भात शिक्षणतज्ज्ञ, संस्थाचालक व शिक्षक संघटना यांच्या बैठका होऊन वैचारिक मंथन सुरू झाले.

या चाचण्यांमुळे गुणवत्ता वाढणार नाही, असा निष्कर्ष काढून एकजुटीने विरोध केला. मुख्यमंत्री विलासराव देशमुख, यांना या प्रकरणात हस्तक्षेप करावा लागला. शिक्षणमंत्री वसंत पुरकेंना माघार घ्यावी लागली. आपला हा निर्णय अगदी योग्य विद्यार्थ्यांच्या व देशाच्या भावी पिढीच्या दृष्टीने दूरगामी परिणाम करणारा होता, असा शिक्षणमंत्र्यांचा समज झाला आणि त्यांनी या उपक्रमास विरोध करणाऱ्या शिक्षकांवर आपला रोष केला. एक शिक्षक ३० पिढ्यांची वाट लावतो, अशी टीका त्यांनी केली, वसंत पुरके यांच्या या आरोपात किती तथ्य आहे ?

खरोखरच शिक्षणाच्या दूरावस्थेस केवळ शिक्षकच जबाबदार आहेत का ? याचा सारासार विचार केल्यास शिक्षणाचे ध्येयधोरण ठरविणारे राज्यकर्ते व वरिष्ठ नोकरशहा हेच शिक्षणाचा बट्ट्याबोळ करण्यास जबाबदार असल्याचे दिसून येते. शिक्षणाच्या बाबतीत स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या ५-१० वर्षांच्या कार्यकाळावर प्रकाश टाकला असता असे दिसून येईल की, कोणत्याच स्वरूपाच्या चाचण्या न घेता शिक्षणात गुणवत्ता होती. पुढे शिक्षणाचे धोरण दिल्ली- मुंबईत वातानुकूलित खोल्यात बसून घेण्यास सुरूवात झाली आणि शिक्षण क्षेत्राची वाताहत सुरू झाली.

बेसिक एज्युकेशन (पायाभूत शिक्षण) ते प्रौढ शिक्षण स्वातंत्र्यानंतर म. गांधींचे श्रम, स्वदेश, स्वालंबन हे तत्त्व विद्यार्थी जीवनात त्यांच्या अंगी यावे म्हणून १९५३-५४ या काळात बेसिक एज्युकेशनला शालेय स्तरापासून सुरूवात करण्यात आली होती. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना शाळेत चरख्यातून सूत काढणे हे शिकविले जात होते. स्वावलंबनाचे महत्त्व ओळखून चरखा दिंडी काढली जात होती. गावपातळीवर ४ थी पर्यंत शाळा होत्या. एका वर्गात जेमतेम २० ते ३० विद्यार्थी, शिक्षक वर्ग, विद्यार्थी संख्या मर्यादित असल्याने प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देण्यास शिक्षकांकडे वेळ असे. त्यावेळी शिक्षक मंडळी ही प्रशिक्षित नव्हती तरीपण अध्यापन प्रभावीपणे करीत त्यावेळी केवळ सहामाही व वार्षिक परीक्षा या दोनच परीक्षा होत. घटक चाचण्यांचा प्रकारही त्यावेळी नव्हता.

निरक्षरता हा देशाचा कलंक आहे असे म्हणत प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम सुरू झाला आणि ग्रामीण भागातील वर्गात विद्यार्थ्यांना शिकवणारा शिक्षक बाहेर पडला. ग्रामीण भागात शाळेतील अध्यापनाव्यतिरिक्त शिक्षकांना प्रौढ शिक्षणाचे राष्ट्रीय कार्य करावे लागले. 'राष्ट्रीय' कार्य असल्याने साहेबांचा दबाव यामुळे गरीब शिक्षक

दिवस–रात्र प्रौढ शिक्षणाचे वर्ग घेऊ लागला आणि नकळत देशाची भावी पिढी वर्गातून गायब होत गेली. राष्ट्रीय कार्यक्रमाचा बडगा दाखवून शिक्षकांना कसेही राबविता येते, हे राज्यकर्ते–नोकरशहांच्या लक्षात अल्यानंतर त्यांनी जनगणनांपासून ढोरगणना व नाचण्यापासून बावर्च्याची अशैक्षणिक कामे शिक्षकावर लादली आणि पाहता–पाहता शिक्षक हा 'बहुरूपी' कधी झाला हे कोणालाच कळले नाही. ही झाली जिल्हा परिषद, नगरपालिकांच्या शाळेतील शिक्षण व शिक्षकांची दुरवस्था तर दुसरीकडे खासगी शिक्षण संस्थांची अवस्था ही अशीच.

**धंदेवाईक शिक्षण सम्राटांचे पेव**

जिल्हा परिषदेच्या शाळांची अशी वाट लावल्यानंतर राज्यकर्त्यांना असे वाटले की, विद्यार्थ्यांचे भवितव्य जिल्हा परिषदच्या शाळेत सुरक्षित नाही, असे म्हणत त्यांनी खासगी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागात शाळा उघडल्या शिक्षणाचा प्रचार– प्रसार या गोंडस नावावर शाळा नव्हे दुकाने उघडली. या शाळांमध्ये गुणवत्तेच्या आधारावर नव्हे केवळ देणग्या घेऊन शिक्षक–कर्मचाऱ्यांची भरती केली. तेव्हा पैसे देऊन शिक्षकी पेशा स्विकारणाऱ्या पोटार्थी शिक्षकाकडून गुणवत्तेची अपेक्षा कशी करता येईल. थोडक्यात, शाळा मिळविण्यापासून नोकरी लागण्यापर्यंत 'रेट' ठरला.

**प्रामाणिक संस्था, शिक्षकांना संरक्षण हवे**

तळागाळातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवायची असेल तर प्रामाणिक काम करणाऱ्या शिक्षकांना, संस्थाचालकांना राज्यकर्त्यांकडून पुरेसे पाठबळ मिळावयास हवे. शिक्षणाविषयी तळमळ असणाऱ्या शिक्षकास स्थानिक कार्येकर्ते, अधिकारी त्रास देतात. हुजरेगिरी, कामचुकार, राजकारणी शिक्षकास आदर्श शिक्षक पुरस्कार मिळतात. शिक्षणासाठी दायित्वाची भूमिका असणाऱ्या चांगल्या संस्थेला शाळा मिळत नाहीत. शाळा असणाऱ्या संस्थेला तुकड्या मिळत नाहीत. पैसा देऊन बोगस शाळा चालवल्या जातात. शिक्षणाधिकारी चिरीमिरी घेऊन चूप राहतात. प्रामाणिक कार्य करणाऱ्या संस्थेवर नियमाचे बोट दाखवून शिक्षण खात्यातील अधिकारी कारवाई करतात. शिक्षणक्षेत्रात नोकरशाहीचा संघटित अवास्तव, अविवेक, अनियंत्रित हस्तक्षेप वाढल्याने ही परिस्थिती निर्माण झाली. या सर्व गोष्टींवर नियंत्रण ठेवणारी प्रामाणिक यंत्रणा जोवर निर्माण होणार नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने शिक्षणातील गुणवत्ता वाढणार नाही.

(देशोन्नती ३ सप्टेंबर २००६)

■■

# शाळांच्या विशेष पटपडताळणी नंतर आता सर्वच क्षेत्रांचे मूल्यांकन करावे

**पुरोगामी** राज्याचे आदरणीय मुख्यमंत्री विनंती विशेष की, आपण 'आदर्श' राज्याचे प्रमुख या नात्याने महाराष्ट्रातील तथाकथित शिक्षण महर्षींची झाडाझडती घेण्याच्या दृष्टीने शिक्षण क्षेत्रात विशेष पटपडताळणी मोहीम हाती घेतल्याबद्दल सर्वप्रथम आपले हार्दिक अभिनंदन करतो. 'नांदेड पॅटर्न' मुळे उघडकीस आलेल्या शैक्षणिक भ्रष्टाचाराचे खरे स्वरूप राज्यातील इतर जिल्ह्यांत कितपत पोहचले आहे हे जाणून घेण्याच्या उद्देशाने 'नांदेड पॅटर्न' ची पटपडताळणी मोहीम राज्यात राबविली; त्यांचे फलीत आज समोर आले. राज्यातील सुमारे १५ टक्के विद्यार्थी हे बोगस / अनुपस्थित असल्याचे विशेष पटपडताळणी मोहिमेतून समोर आले आहे. अनेक शैक्षणिक संस्था कागदोपत्री असल्याचेही या मोहिमेतून स्पष्ट झाले आहे. शिक्षण क्षेत्रातील शुद्धीकरणाच्या मोहिमेचा 'आदर्श' देशभरात इतर राज्यांनीही घ्यावा, अशी केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्रालयाने दखल घेऊन राज्याच्या शिक्षणमंत्र्यांची नियुक्ती केंद्रीय समितीत करून महाराष्ट्राचा 'आदर्श पॅटर्न' देशात राबविण्याचा निर्णय घेतला ही बाब राज्यातील तमाम जनतेला अभिमानाची बाब आहे.

आदरणीय मुख्यमंत्रीजी आपण पुरोगामी महाराष्ट्राचे नेतृत्व करीत आहात. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे खरे वारसदार आहात. आपण निश्चितच महात्मा फुलेंचे समग्र वाङ:मय अभ्यासले असेल म्हणूनच आपणास शिक्षणाविषयी कमालीची दृष्टी असल्याने आपण विशेष पटपडताळणी मोहीम राबवून राज्याचे नाव देशपातळीवर उंचावले. महात्मा फुलेंनी त्याकाळी शिक्षण क्षेत्राकडे इंग्रजाच्या अक्षम्य दुर्लक्षाबाबत प्रहार केले. शिक्षणावर एकूण राष्ट्रीय उत्पन्नाचा किती टक्के खर्च होतो. शेतकरी / कष्टकरी समाज केवळ आर्थिक व दैनंदिन गरजांपायी आपल्या मुला-मुलींना

शाळेत पाठवत नाही याचे वास्तव चित्र इंग्रज सरकार समोर मांडले. आजही फुलेंच्या काळातील चित्र ग्रामीण भागात पाहावयास मिळते. महाराष्ट्र राज्य स्थापनेचा सुवर्ण जयंती महोत्सव नुकताच साजरा झाला. पटपडताळणी मोहिमेच्या निमित्ताने ग्रामीण भागातील शिक्षणाविषयी अनास्था समोर आली आहे. मोठा गाजावाजा शैक्षणिक 'भ्रष्टाचाराबाबत जी विशेष पटपडताळणी मोहीम राज्यात राबविली गेली; त्यात केवळ १५ टक्के विद्यार्थी आर्थिक अथवा इतर परिस्थितीमुळे अनुपस्थित होते. काही शैक्षणिक संस्था या १०० टक्के बोगस असल्याचे आढळून आले त्या बोगस संस्था कोणत्या राजकीय पक्षाच्या नेत्यांच्या आहेत हे सर्वश्रुत आहे.

या मोहिमेतून अनुपस्थित विद्यार्थी हे बोगस असल्याचा जावई शोधही आपल्या प्रशासनातून व्यक्त होत आहे. ही एक बाब शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षकांना खटकणारी आहे. आपल्या विशेष पटपडताळणीचा धसका घेऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ३ ते ५ ऑक्टोबर या कालावधीत शाळेत उपस्थित राहण्याबाबत ज्या शिक्षकांनी ग्रामीण भागातील गाव-तांडे वस्त्या पाहिल्या तेव्हा स्वातंत्र्याच्या ५८ वर्षांनंतरही 'आम आदमी' किती उपेक्षित आर्थिक गुलामीत जगत आहे, याचे भयाण वास्तव गुरुजींच्या निदर्शनास आले. आई आजारी, बाप सालगडी म्हणून दुसऱ्या जिल्ह्यात मुला-मुलीला शाळेत पाठविल्यास घरातील चूल पेटणार कशी ? असे वास्तव चित्र ग्रामीण भागात पाहावयास मिळाले. शहरालगत असणाऱ्या गावातील शेतकऱ्यांना सोयाबीनची काढणी करण्यासाठी मजूर मिळत नाहीत. तोंडी आलेला घास पटपडताळणी मोहिमेमुळे निघून जातो की काय ? या धास्तीने गावातील मुलांना शाळेत आणण्यासाठी गुरुजींनाही नेत्याप्रमाणे निवडणूक काळातील कसरती कराव्या लागल्या.

आदरणीय मुख्यमंत्रीजी आपण उच्च विद्याविभूषीत आहात. एक पारदर्शक व निष्कलंक नेतृत्व म्हणून देशात परिचित आहात. म्हणूनच एक आदर्श व्यक्ती म्हणून कॉंग्रेस श्रेष्ठीने महाराष्ट्राची धुरा आपल्यावर सोपविली आहे. तेव्हा आमच्या तमाम शिक्षण क्षेत्रातील संस्थाचालक, मुख्याध्यापक व शिक्षकांच्या वतीने अशी विनंती करण्यात येते की, शिक्षण क्षेत्र वगळता आता सर्वच क्षेत्राची 'पटपडताळणी' व्हावी ज्यात कोणत्या विभागासाठी किती पैसा खर्च झाला याचा लेखाजोखा जनतेसमोर मांडावा. या मोहिमेत गुरुजींनाही सामील करून

घ्यावे. कारण गुरुजी हे शासनाचे अत्यंत विश्वासू असल्याने त्यांना जनगणनेपासून ढोरगणनेपर्यंत कामे दिली. आता राज्याचा एकूण आर्थिक व्यवहाराचे ऑडीट / लेखाजोखा करताना गुरुजींना सहभागी करून राज्यातील नेतृत्वाचे मूल्यमापन महाराष्ट्राच्या सुवर्ण जयंती महोत्सवाच्या अनुषंगाने व्हावे, राज्य स्थापनेच्यावेळी राज्याची आर्थिक परिस्थिती व सुवर्ण महोत्सवी वर्षानंतर राज्याची आर्थिक परिस्थिती याचा लेखाजोखा जनतेसमोर मांडला जावा. जेणेकरून राजकीय सत्य जनतेसमोर येईल. ही मुख्याध्यापक / नागरिक या नात्याने विनंती करण्यात येत आहे.

कळावे, लोभ असावा.

जयहिंद, जय महाराष्ट्र

(लोकपत्र – दि. १६ ऑक्टोबर २०११)

# अधिकाऱ्यांच्या हुकूमशाहीला लगाम

**केंद्र** व राज्यातील सरकार हुकूमशाही पद्धतीने निर्णय घेत असल्याची टिका होत असताना राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकारने शिक्षण क्षेत्रातील नोकरशाहीच्या हुकूमशाही वृत्तीला ब्रेक लावून अधिकाऱ्यांची शाळा भेट ही विद्यार्थी केंद्रित, वर्गभेट झाली पाहिजे, असा आदेश काढून शिक्षण क्षेत्रातील अधिकाऱ्यांची हुकूमशाही मोडीत काढण्याचा उचित निर्णय घेतला. भाजप सरकारचे इतर क्षेत्रात घेतलेले निर्णय बरे की वाईट असा प्रश्न आहे. असो परंतु शिक्षण क्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या हुकूमशाहीला लावलेला ब्रेक राज्यातील शैक्षणिक प्रगतीला चालना देणारा ठरणार आहे.

मागील काँग्रेस–राष्ट्रवादीच्या सरकारपासून खासगी अनुदानित शाळांसंदर्भाचे अनेक जटिल प्रश्न निर्माण झाले. शैक्षणिक गुणवत्ता खुंटण्यास त्या काळातील शिक्षण क्षेत्रातील विविध अध्यादेश, निर्णय ही त्या मागील कारणे आहेत. भाजपा–सेना सरकार राज्यात सत्तेवर आल्यानंतर शिक्षण क्षेत्रातील अनागोंदी कमी होईल, अशी अपेक्षा होती. परंतु गेल्या दोन वर्षांच्या कार्यकाळात भाजपा–शिवसेना सरकारने तब्बल २००च्या वर शिक्षणक्षेत्रासंबंधी शासन निर्णय काढून अनागोंदीत भर घातली. बरेचसे निर्णय एक ना धड भाराभर चिंध्या असेच आहेत. स्वयं अर्थसहाय्यित शाळा, इंग्रजी शाळा यामुळे अडचणीत सापडलेल्या अनुदानित शाळेचा प्रश्न या सरकारच्या काळात अधिक गंभीर झाला आहे. संच मान्यतेसंदर्भात विद्यार्थी संख्येसंदर्भात सतत बदलणारा निकष यामुळे शिक्षक व संस्थाचालक यांच्यासमोर वर्ग तुकडी व शिक्षक पद टिकविण्यासाठी टांगती तलवार कायम आहे. अतिरिक्त होण्याच्या भीतीमुळे विद्यार्थी टिकविण्याच्या अग्निपरीक्षेची वेळ शैक्षणिक सत्र सुरू होताच शिक्षक व संस्थाचालकावर येते, याचा प्रत्यक्ष;, अप्रत्यक्ष परिणाम शैक्षणिक गुणवत्ता

व अध्यापनावर होत आहे. शिक्षण क्षेत्रातील अनेकांपैकी एका समस्येचे हे उदाहरण आहे. 'शिक्षण हक्क' कायद्यामुळे भौतिक सुविधा, शैक्षणिक साहित्य असे शाळेसंदर्भात १०नामांकन पुर्ण करणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. शिक्षक हक्क कायद्याचा बडगा दाखवून शाळा तपासणीस आलेले शिक्षण विभागाचे अधिकारी नेमक्या या मर्मावरच बोट ठेवून शाळेला पर्यायाने शिक्षकाला वेठीस धरण्याचे काम सर्रासपणे करताना दिसले. शिक्षण विभाग हा शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी, प्रगतीसाठी संबंधित शाळेला सहकार्य करून त्या अनुषंगाने मार्गदर्शन करण्याची अपेक्षा ठेवली जाते.

पण अलीकडे शासकीय सेवेतील नोकर भरतीचे प्रमाण घटल्याने. खासगी अनुदानातील शाळेतील शिक्षक भरतीचे वधारलेले भाव लक्षात घेऊन काही महाभाग अधिकाऱ्यांना अशा खासगी अनुदानित शाळा हे आयते घबाड म्हणून हाती लागते. शिक्षक मान्यते (ॲप्रूव्हल) च्या नावावर लाखोंची उधळण होते. संस्थाचालक व शिक्षणाधिकारी यांच्यातील शिक्षक ॲप्रूव्हल अर्थ प्राप्तीच्या प्रतिष्ठेचा विषय आहे. संस्थाचालक व शिक्षणाधिकारी यांचे यासंदर्भात सूत जमले तर ठीक नाही तर हा प्रतिष्ठेचा प्रश्न न्यायालयात जातो.

राज्यातील खासगी अनुदानित शाळेतील शिक्षक ॲप्रूव्हलचे शेकडो प्रकरणे उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. याचा विपरित परिणाम शिक्षकांवर होतो. पर्यायाने विद्यार्थी, अध्यापनावरही होतो. शिक्षक ॲप्रुव्हल हा शिक्षण विभागाचा केंद्रबिंदू आहे. याच्याभोवतीच शाळा तपासणी संच मान्यतेचा अर्थ दडला आहे. ॲप्रूव्हल अर्थ प्राप्त करण्यासाठी शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांशी अनेक खासगी शाळांविरुद्ध रणशिंग फुकल्याच्या घटना आहेत. गुणवत्तापूर्ण कार्य करणाऱ्या अनेक शाळांची वाट लावण्याची उदाहरणे राज्यात आहेत. मराठवाड्यातील एका अनुदानित शाळेवर एक पद भरण्यासाठी चक्क शिक्षकाच्या खून प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा ठोठावलेल्या आरोपीस बेकायदेशीरपणे मुख्याध्यापकपदी नेमून शिक्षणाधिकाऱ्यांनी शिक्षक भरती केली. सदर प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेले. प्रकरण शिक्षण विभागाच्या अंगलट येते हे लक्षात आल्यानंतर शाळा मान्यतेचे निकष पूर्ण करीत नाहीत, असा ठपका ठेवून सदरील शाळेची मान्यता काढली. एक हजार ग्रामीण विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडून शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी एका ॲप्रुव्हलसाठी हा खटाटोप केला.

पुढे उच्च न्यायालयाने शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना फटकारून शाळा पूर्ववत सुरू ठेवण्याचे आदेश दिले खरे पण या घटनेवरून शिक्षण विभागातील अधिकारी हे कशा पद्धतीने काम करतात हे दिसून येते. फडणवीस सरकारने शाळा भेटीसंदर्भात हुकूमशाही वृत्तीला ब्रेक लावून लोकशाही पद्धतीने मार्गदर्शन करून विद्यार्थी केंद्रीत शाळा तपासणीचा निर्णय निश्चित स्वागतार्ह आहे. परंतु याचबरोबर खासगी शाळांना मोफत वीज, संगणक, इंटरनेट सुविधा आदी उपलब्ध करून दिल्यास खऱ्या अर्थाने शिक्षण क्षेत्रात जलद प्रगत महाराष्ट्र होईल.

(पुण्य नगरी– दि. २१ फेब्रुवारी २०१७)

■■

# कोरोनाच्या आड बालकाच्या शिक्षण हक्कावर गदा .

## गुरुकुल , मेकॉले ते स्वयंअर्थसहाय्यीत शिक्षण व्यवस्था

**युनेस्कोने** शिक्षणाला मुलभूत हक्कात समाविष्ट केले आहे. मानव निर्मित अथवा नैसर्गिक संकटातही मुलांना (बालकांना) शिक्षणाच्या हक्का पासून त्यांना वंचित ठेवता येणार नाही असा युनोचा कायदा आहे. असे असतांना गेल्या दिड वर्षापासून कोरोना जागतिक संसर्गाची भिती दाखवून जगातील चालकांना / मुलांना शिक्षणाच्या हकापासून वंचित ठेवण्यात येत आहे. जगातील त्या-त्या देशातील राज्य शासनकर्ते कोरोनाचे संकट समोर करुन शाळा बंद, पण शिक्षण चालू (ऑनलाईन) असा अजब तर्कट प्रचार व प्रसार करीत आहे. प्रचलित शिक्षण व्यवस्था मोडीत काढून ऑनलाईन शिक्षण व्यवस्था जगावर लादू पाहत आहे. शिक्षण ही सतत बदलणारी प्रक्रिया आहे. पण ते नेहमीच मूठभरांच्या हाती राहिलेली आहे. सर्वसामान्यांपर्यंत शिक्षण पोहचण्यासाठी प्रचंड संघर्ष करावा लागला. त्यानंतरच शिक्षणाचे वारे तळागाळांतील वर्गापर्यंत वाहू लागले. सध्याची शिक्षण व्यवस्था मोडीत काढून ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून पुन्हा मुठभरांसाठीचे शिक्षण हे मुठभरांसाठीच आणण्याचा घाट रचला जात आहे. शिक्षण चळवळीचा इतिहास व त्याची वाटचाल याचा ऊहापोह करण्याच्या उद्देशाने सदर लेख देत आहोत.

### शिक्षण व्यवस्थेतील स्थित्यंतरे

मानवाच्या प्रगतीच्या इतिहासात शिक्षण हा प्रमुख पाया आहे. प्राचीन काळात शिक्षण हे धर्म व राज्यसत्तेच्या ताब्यात होते. भारताच्या संदर्भात बोलायचे झाल्यास भारतीय समाज व्यवस्थेत शिक्षणाचा हक्क केवळ ब्राम्हण समाजालाच होता. धनुर्विद्येसाठी शुद्र एकलव्याचे बोट छाटणे असो की, शंभुकाने वेदज्ञानार्जन केल्याने त्यांचे मुंडके उडविण्याचा शिक्षणातील या हिंसक इतिहासाबरोबरच मध्ययुगीन काळात तुकारामांच्या गाथा इंद्रायणीत बुडविण्याचा

प्रकार ही काही त्यांची उदाहरणे आहेत. गुरुकुल ही भारतीय शिक्षणाची प्राचीन परंपरा आहे. इंग्रजांच्या आक्रमणाने देशावर इंग्रजांची सत्ता स्थापण झाल्यावर त्यांनी आपल्या शासन व्यवस्थेत सुसूत्रता आणण्यासाठी मॅकॉलेनी शिक्षण व्यवस्था अस्तित्वात आणली. गुरुकुल ही शिक्षण व्यवस्था प्रचलित शासन व्यवस्थेत उपयुक्त नसल्याने ती बंद पडली. साधारण १८५० मध्ये भारताची प्राचीन गुरुकुल व्यवस्था संपली. इंग्रजी राज्य व्यवस्थेत भारतातील राजेशाही चाकरीत असलेल्या महसुली सैन्य व अन्य विभागातील कर्मचाऱ्यांना इंग्रजाच्या दरबारी नौकरी प्राप्त करण्यासाठी इंग्रजाच्या मेकॉले पुरस्कृत शिक्षण घेणे अपरिहार्य होते. इंग्रजाच्या शासन व्यवस्थेत सामिल झालेल्या समाजाला आपले राजेशाहीतील अधिकार इंग्रजाच्या दरबारात ही कायम राहण्यासाठी हे इंग्रजी शिक्षण मिळावे यासाठी या समाजाने इंग्रजी शासकांकडे आग्रह धरला. वेळ प्रसंगी या समाजाने आंदोलने करून सदरचे शिक्षण आपल्या पदरात पाडून घेतले. इंग्रजी शासन व्यवस्था ही शोषणावर आधारीत असली तरी ती सुधारणावादी होती. त्यामुळे हजारोवर्षांपासून भारतातील विशिष्ट समाजापर्यंत मर्यादीत असलेले शिक्षण उपेक्षित घटकापर्यंत पोहचण्यासाठी इंग्रजानी दायित्व दाखवल्याने शिक्षणाच्या हक्काबाबत बहुजन समाजातून चळवळी उभ्या राहिल्या. महात्मा ज्योतीराव फुले, छत्रपती शाहू महाराज या महाराष्ट्रातील महंताबरोबरचं बडोद्याचे सयाजीराव महाराज यांनीही स्त्री शिक्षण, बहुजन समाज व अस्पृश्य समाज यांच्या शिक्षणासाठी पुढाकार घेतला. त्यावेळीही शिक्षणासाठी यासर्वांना मोठा संघर्ष करावा लागला. शिक्षणाच्या प्रवाहाचा इतिहासाचा आढावा याठिकाणी घेण्याचे प्रयोजन यासाठी आहे की, तळागाळाच्या वर्गापर्यंत शिक्षण पोहचण्यासाठी किती संघर्ष करावा लागला याचा आढावा घेतल्याशिवाय शिक्षणाची सध्याची जी वाटचाल आहे. हे समजण्यास सोपे होईल.

### शिक्षण: चातुर्वर्ण्य केंद्रित विषमतावादाकडून समतावादाकडे

१९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. त्यावेळी देशात साक्षरतेचे प्रमाण केवळ १२ टक्के होते. उच्चवर्गीयांसाठी कॉन्व्हेंट व पब्लिक स्कूलच्या माध्यमातून शिक्षणाची सोय उपलब्ध होती. बहुसंख्य ग्रामीण भागात शिक्षण पोहचलेले नव्हते. देशासमोर अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत बाबीबरोबरचं निरक्षरता ही मोठी समस्या होती. साक्षरतेशिवाय आधुनिक औद्योगिक युगात भारताचे स्थान

निर्माण करणे शक्य नव्हते. त्यामुळे भारताची घटना लिहिताना डॉ. आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत शिक्षणाचा हक्क अबाधित ठेवला. याशिवाय जागतिक औद्योगिक युगात भांडवली देशांनाही शिक्षित मनुष्यबळाची गरज होतीच. त्यामुळे युनेस्कोच्या माध्यमातून जगभरातील विकसित व गरीब देशांनी शिक्षणात भरीव आर्थिक मदतीची तरतूद केली. आपल्या देशाचा विचार केल्यास विशेषत: महाराष्ट्राच्या अनुषंगाने त्या वेळच्या शिक्षण पद्धतीवर प्रकाश टाकल्यास असे दिसून येते की, त्यावेळी जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी अनुदानित शाळा या कार्यरत होत्या. या शाळेच्या माध्यमातून कष्टकरी, उपेक्षित तळागाळापर्यंत शिक्षण पोहचत होते. स्वातंत्र्याच्या ३-४ दशकांपर्यंत समाजातील वेगवेगळ्या घटकांसाठी शिक्षणात मोठ्या प्रमाणात तरतूद करण्यात आली. प्रौढ शिक्षण, अंध, अपंग शिक्षणांसाठी, अल्पसंख्यांकासाठी शिक्षण, विविध उपेक्षित जाती समुहासाठी शिक्षण असे विविध अंगी शिक्षणाचे धोरण अवलंबल्याने शिक्षणाचे वारे वाड्या-तांड्यापर्यंत पोहचले. शासनाचे हे धोरण महात्मा फुले व छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होते. त्यांच्या या धोरणाचा सकारात्मक परिणाम शिक्षण क्षेत्रात पहावयास मिळाला. ग्रामीण, कष्टकरी, उपेक्षित समाजाची एक शिक्षित पिढी निर्माण झाली. त्यांनी देशातच नव्हे तर विदेशातही विविध क्षेत्रात आपला दबदबा निर्माण करून देशाच्या प्रगतीत या पिढींचे मोलाचे योगदान दिले. ही शिक्षित पिढी निर्माण करण्यामागे स्वातंत्र्यानंतर तेंव्हाची सामाजिक जाण व निरपेक्ष वृत्तीने काम करणाऱ्या शैक्षणिक संस्था व शिक्षकांचा त्याग आहे. त्यावेळी जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था व शासन अनुदानित शाळा या समाजाच्या ज्ञानाच्या एकमेव केंद्र होत्या. या शाळेत समाजातील सर्व घटकातील मग ते बडे राजकीय नेते असो, उच्चपदस्थ अधिकारी असो अथवा आर्थिक संपन्न व्यापारी वर्ग असो या सर्वांची मुले एका छत्राखाली ज्ञानप्राप्ती करीत होते पण कालांतराने शिक्षण क्षेत्रात राजकारण व अधिकार शाहीचा चंचु प्रवेश झाला तो असा शिक्षण खात्यातील अथवा प्रशासनातील अधिकारी व राजकीय नेते यांनी अभ्यासात कच्च्या असलेल्या पाल्यास शिकविण्यासाठी शिक्षक / गुरुजींना घरी बोलविण्यास सुरुवात केली. त्यातून शिक्षकांचे राजकीय व प्रशासनातील अधिकाऱ्यांशी सलगी वाढली. त्यातून ट्युशन (खाजगी शिकविणी) या दुसऱ्या ज्ञान केंद्राची (जी की

व्यावसायिक व स्वअर्थ प्राप्तीसाठी) राजकीय / प्रशासनाच्या आशीर्वादाने शिक्षकांची ओढ ही अर्थाजनाकडे वाढू लागली. तत्वापेक्षा सत्ताकारण हे राजकारणाचे गणित ठरु लागल्याने शिक्षकाचा वापर हा राजकारणात होऊ लागला. खाजगी शिक्षण संस्थेत शिक्षकाच्या नियुक्तीसाठी डोनेशन नावाचा प्रकार सुरु झाला. अशा पद्धतीने ज्ञानाचे एकमेव केंद्र असलेल्या या शाळा, महाविद्यालये हे हळुहळू खाजगी शिकवणीकडे वळू लागले. जिल्हा परिषदेतील शिक्षक हे राजकीय पुढाऱ्यांशी व अधिकाऱ्याशी संधान साधून सोयीच्या ठिकाणी बदल्या करण्यात व्यस्त झाले. खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षक हे संस्थाचालकाशी अर्थपूर्ण बोली करून खाजगी शिकवणी व इतर आर्थिक अशैक्षणिक कार्याकडे वळले. त्यामुळे या शैक्षणिक संस्थेत गुणवत्ता राहिली नाही अशी समाजाची धारणा झाली. राज्यकत्यांनी व प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी शैक्षणिक क्षेत्रातील शासन अनुदानित शाळा, या राजकीय व आर्थिक कुरण या दृष्टीने पाहिल्याने हे क्षेत्र कमालीचे-बदनाम झाले. त्यामुळे ही खाजगी शिक्षण व्यवस्था निर्माण झाली. विना-अनुदानित, स्वयंअर्थसहाय्य इंग्रजी शाळा अशा अनेक खाजगी क्षेत्रातील शाळा अस्तित्वात आल्या त्यांचा प्रचार व प्रसारही झपाट्याने झाला. पुर्वी दहावी व बारावी हे एकमेव असे बोर्ड होते. पण आज शिक्षण क्षेत्रात सीबीएसई, आंतरराष्ट्रीय परीक्षा मंडळ असे बोर्ड अस्तित्वात आले. केवळ सत्ताप्राप्ती व अर्थप्राप्तीसाठी राज्यकर्ते व नोकरशाहीने शिक्षण क्षेत्रात अक्षरश: गोंधळ निर्माण करून अराजकता निर्माण केली आहे.

शिक्षण व्यवस्थेतील स्थित्यंतरे (पूर्वार्ध)
(कृषीवल - ३० जुलै २०२१)

■■

# जागतिक ऑनलाईन व डिजीटल कंपन्यांच्या दबावाला बळी पडून प्रचलित शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त करण्याचे षडयंत्र

**शिक्षण** हे समाज व राष्ट्रनिर्मितीचे केंद्र आहे याचे सोयरसुतक राज्यकर्त्यांना नोकरशाहांना व शिक्षकांना न राहिल्याने दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या मृगजळाकडे म्हणजेचं खाजगी संस्था व कोचिंग क्लासेसकडे समाज धावताना दिसत आहे. समाजासाठी ही शैक्षणिक व्यवस्था निर्माण करुन याच शिक्षण व्यवस्थेतील सर्वघटकांनी अर्थप्राप्तीसाठी शिक्षणाचे रूपांतरण धंद्यात केले. त्यामुळे एकेकाळच्या समानतेच्या शिक्षणाला छेद देवून शिक्षण व्यवस्थेत विषमतावादी व चातुर्वण्य शिक्षण व्यवस्था अस्तित्वात आली आहे. गुणवत्ता व दर्जेदार शिक्षणाच्या नावाखाली मध्यम व निम्न मध्यमवर्गीयांनी शासकीय व शासन अनुदानित शाळेतून आपल्या मुलांना काढण्यास सुरुवात केली. भारताच्या डीआयएसईच्या २०२० च्या अहवालानुसार १९९८ पासून खाजगी शाळेतील मुलांचा आलेख हा सातत्याने वाढत गेला १९७८ मध्ये ३.४ टक्के विद्यार्थी खाजगी शाळेत होते. २०१९ मध्ये ४९.५ टक्के इतके विद्यार्थी खाजगी शाळेत वाढत गेले. आजमितीस देशातील अर्धे विद्यार्थी म्हणजे सुमारे १२ कोटी विद्यार्थी खाजगी शाळेत शिक्षण घेत आहेत. त्यासाठी पालकवर्ग १० हजार ते ३ लाख इतका वार्षिक खर्च करतो. उर्वरित १२ कोटी मुले शासकीय व शासन अनुदानित शाळेत शिक्षण घेतात. एका विद्यार्थ्यामागे शासनास सरासरी वार्षिक ३६ ते ४० हजार रुपये खर्च येतो. यात विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सवलती, शाळेच्या भौतिक सुविधांसह शिक्षकाच्या पगाराचा समावेश आहे. खाजगी शाळेत आपली मुले पाठवणारे ७३ टक्के पालक हे मध्यम व निम्न मध्यमवर्गीय आहेत. त्यामुळे खाजगी शाळेत केवळ श्रीमतांचीच मुले जातात ही चुकीची भावना या सर्वेक्षणातून दूर झाली. देशातील एकंदरित शिक्षण पद्धतीत एक सुसुत्रता आणण्यासाठी केंद्राने नियुक्त केलेल्या एका समितीच्या

आढाव्याच्या अनुषंगाने विद्यमान नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमिताभ कांत एके ठिकाणी म्हणतात की, खाजगी शिक्षण संस्थेत दर्जेदार शिक्षण गुणवत्ता मिळते ही बाब पूर्णत: सत्य नाही. एकंदरीत बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत यत्किंचितच फरक पडतो. खाजगी शिक्षण संस्थेतील केवळ ६० टक्के शाळा ह्या दहावीच्या बोर्ड परीक्षा घेण्यास पात्र ठरतात. त्यामुळे सरकारी व खाजगी शाळेतील नावाने जो अपप्रचार केला जातो त्यात अंशत: सत्यता असल्याचे दिसून येते.

**शिक्षण : समतावादाकडून पुन्हा नवचातुर्वर्ण्य केंद्रित विषमतावादाकडे**

अलीकडे खाजगी शिक्षण संस्था व शिकवणीचे क्षेत्र हे अत्यंत झपाट्याने वाढले आहे. या क्षेत्रातील वार्षिक उलाढाल १.५ ते २ लक्ष कोटी रुपयांची आहे. यावर शासनाचे पाहिजे तेवढे नियंत्रण नाही. तर दुसरीकडे शासनाच्या शैक्षणिक संस्थांमध्ये कुशल व अपुऱ्या मनुष्यबळाच्या अभावी या शैक्षणिक संस्था काम करत आहेत. या परिस्थितीचा फायदा घेवून जागतिक स्तरावरील ऑनलाईन, डिजीटल कंपन्यांनी या क्षेत्रात कोरोना जागतिक संकटाचे निमित्त समोर करुन उडी घेतली आहे. यासाठी वरील परिस्थिती कारणीभूत आहे. या ठिकाणी झुबर्ग व बिल गेट्स या माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील विख्यात व्यक्तीच्या कंपनीने ग्लोबल शिक्षण नितीच्या मार्फत ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून जगातील सर्व शिक्षण एका डिजीटल प्लॅटफार्मवर आणण्याची योजना आखली आहे. शिक्षण क्षेत्र जगातील आर्थिक उत्पनाचे तिसऱ्या क्रमांकाचे क्षेत्र असल्याने यावर ऑनलाईन कंपनीचा डोळा पूर्वीपासूनच आहे आंतरराष्ट्रीय बायजू या ऑनलाईन कंपनीने काही महिन्यापूर्वीचे भारतातील 'आकाश' ही खाजगी संस्था ७२ हजार कोटी रूपयात विकत घेतली आहे. यावरून शिक्षण क्षेत्रावर ह्या बड्या कंपन्या कसा कब्जा करीत आहेत याचे हे उदाहरण आहे. ऑनलाईन कंपन्या आपल्या आर्थिक साम्राज्याच्या जोरावर जगातील शासनकर्त्यावर दबाव आणून गेल्या अनेक दशकापासून सर्वसामान्यांच्या शिक्षणासाठी अस्तित्वात आलेल्या शैक्षणिक संस्था बंद पाडून ऑनलाईन शिक्षण व्यवस्था जगावर लादण्याचा डाव साधत आहे. त्यास शासनकर्ते या दबावास बळी पडत असल्याचे पहावयास मिळत आहे. पण हे सर्व होत असतांना शिक्षण क्षेत्रातील शिक्षकवर्ग,

संस्था चालक, पालक मात्र याकडे निमूटपणे पहात आहेत. ही शोकांतिका आहे. भारतावर जेव्हा जेव्हा परदेशी आक्रमण झाले त्या त्या वेळी देशातील राजेशाही आपल्या ऐश आरामात मशगुल होती. आज शिक्षण क्षेत्रात आक्रमण होत असतांना शिक्षण क्षेत्रातील शिक्षक मंडळी, पालकवर्ग, शासन व प्रशासन हे सर्व निमुटपणे पाहत आहेत. एकेकाळी मुंबई हे कापड गिरण्याच्या माध्यमातून भारताचे एक आर्थिक केंद्र होते. कालांतराने गिरणी मालक व कामगार यांच्यातील संघर्ष वाढला. गिरण्या बंद पडल्या. लाखो कामगार बेरोजगार झाले. देशोधडीला लागले. यातून गरीबी, गरीबीतून अवैध व्यवसाय व गँगस्टार संस्कृतीचा उदय झाला. यात हजारो कामगारांच्या संसाराची राख रांगोळी झाली. आज बहुजनांसाठी निर्माण झालेल्या शिक्षणव्यवस्थाही अशाच वळणावर येवून ठेपली असतांना ना शिक्षणसंस्थेला, ना शिक्षकाला, ना पालकाला त्यांची चिंता आहे. शिक्षणात रोजगार अभावी भरकटत असलेला तरुण आता कोणत्या मार्गाने जाणार आहे हे कोरोना पर्वानंतर आपणास कळेल.

शिक्षण व्यवस्थेतील स्थित्यंतरे
(उत्तरार्ध)
(कृषीवल– दि. ३१जुलै २०२१)

■■

# शिक्षण खात्यात येतेय ‘वाझे’ प्रवृत्ती !

मुख्याध्यापकाचे
मुख्यमंत्र्यांना खुले पत्र

**मा. उद्धवजी ठाकरे**

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

यांना जय महाराष्ट्र, स. न. वि. वि.

आपणास प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे व बाळासाहेब ठाकरे या सामाजिक व राजकीय महंताचा समृध्द वैचारिक वारसा आहे. सामाजिक व प्रबोधनाचा वारसा असणाऱ्या व्यक्ती राजकारणात संवेदनशील असतात. म्हणून शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात सध्या काय चालू आहे याकडे लक्ष वेधण्यासाठी या पत्राचे कारण देतोय. मीही एका स्वातंत्र्यसैनिक व आदर्श शिक्षकाचा मुलगा आहे. आपण शिक्षण क्षेत्रातील अपप्रवृत्तीविरुद्ध संवेदनशील मनाने व सामाजिक हितासाठी निर्णय घ्याल, अशा अपेक्षेने या पत्राचे प्रयोजन आहे. महाराष्ट्राच्या शिक्षण चळवळीला एक वेगळा इतिहास आहे. महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षण व बहुजनाच्या शिक्षणासाठीचा हुंकारलेला लढा देशाला नव्हे तर संपूर्ण जगाला मार्गदर्शक ठरला आहे. छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या पुढाकाराने कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील कष्टकरी, उपेक्षित व शेवटच्या घटकापर्यंत ज्ञानगंगा पोहोचवली. रयत शिक्षण संस्थेचा वटवृक्ष हा शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे हे आपणास ज्ञात आहे. महाराष्ट्रात आपल्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे सरकार स्थापन

झाले. तेव्हा स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रातील तमाम मराठी माणसाचे ऊर स्वाभिमानाने भरून आले. त्यास कारणही तसेच आहे. प्रथमच दिल्लीच्या सत्ता केंद्राला झुगारून आपण महाराष्ट्रात सरकार, शिवशासन स्थापन केले. म्हणून महाराष्ट्रातील शिक्षण, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात एक नव्या परिवर्तनाची अपेक्षा आपल्या सरकारकडून अपेक्षित होती व आहे. आपल्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाल्यानंतर काही महिन्यांतच एका पोलिस निरीक्षकाच्या पदावर सचिन वाझेची पुनर्नियुक्ती व त्यानंतर सचिन वाझे व मुंबईचे तत्कालीन पोलिस आयुक्त परमवीरसिंग यांनी केलेल्या प्रतापाने महाराष्ट्राच्या पोलिस दलाची व विशेषत: राज्यकर्त्यांची बेअब्रू व बदनामी झाली ती कधीच भरून निघणारी नाही. एका साध्या पदावरील व्यक्तीची पुनर्नियुक्ती न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध पोलिस दलातील वरिष्ठ अधिकारी करतात, ही बेकायदेशीर बाब तपासण्याची तसदी संबंधित विभागाचे मंत्री घेत नाहीत ही चूक महाराष्ट्राच्या बदनामीस कारणीभूत ठरली. यामुळे माजी गृहमंत्र्याला एखाद्या आरोपीप्रमाणे लपून बसावे लागत आहे. यापेक्षा कोणती नामुष्की असू शकत नाही. 'वाझे शुक्लकाष्ट' राज्य सरकारवर कायम असताना भ्रष्ट अधिकाऱ्यांवर किती विश्वास ठेवावा हा धडा सदर प्रकारातून राज्यातील काही मंत्र्यांनी घेतला नसल्याचे दिसून येते.

शालेय शिक्षण खात्याचाही कारभार व शासनाचा (शिक्षण क्षेत्राचा) डोलारा हा अशाच काही भ्रष्ट, नियमबाह्य काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवरच उभा आहे की काय? अशी परिस्थिती या विभागातील काही प्रकरणातून दिसून येते. शिक्षण क्षेत्र हे समाज, राष्ट्र उभारणीत महत्वाचे आहे. अशा पवित्र शिक्षण क्षेत्रात 'वाझे' सारखी प्रवृत्ती धुडगूस घालून विद्यार्थी व शिक्षकांच्या जीवनाशी खेळत आहे. यास वेळीच वेसण घालण्याचे संबंधित खात्याचे मंत्री धाडस न दाखविता त्याच्या तालावर नाचत असल्याने पुरोगामी महाराष्ट्रातील गौरवशाली शिक्षण व्यवस्थेची वाटचाल ही तालिबानी वृत्तीकडे होण्याच्या भीतीने आमचे मन अत्यंत दु:खी झाल्याने हे आत्मक्लेशाचे पत्र लिहीत आहे. मी ज्या शाळेत मुख्याध्यापक आहे त्या शाळेचे नाव विद्यासागर विद्यालय, खानापूर (चित्ता), ता. जि. हिंगोली. ही शाळा श्री. गजानन शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेमार्फत चालविण्यात येते. संस्थेला ३२ वर्षे

झाली असून, या संस्थेमार्फत चार माध्यमिक शाळा चालविण्यात येतात. ग्रामीण व दुर्गम भागात गुणवत्तापूर्वण शिक्षण देण्याबरोबर सामाजिक क्षेत्रात या संस्थेचा जिल्ह्यात नावलौकिक आहे. या शाळेतील ८०० पेक्षा अधिक विद्यार्थी हे शासकीय, प्रशासकीय पदावर, संरक्षण दल व बहुराष्ट्रीय कंपन्यात विविध पदांवर कार्यरत आहेत. ही जिल्ह्यातील नामांकित संस्था आहे. शिक्षण खात्यातील काही भ्रष्ट व गुन्हेगारी प्रवृत्तीचे अधिकारी संघटितपणे षड्यंत्र रचून या संस्थेला, शाळेला बदनाम करून शाळेवर प्रशासक नेमण्याची कार्यवाही करून शैक्षणिक अराजकता निर्माण करतात व शिक्षणमंत्रीही या अधिकाऱ्यांच्या कृत्याला साथ देतात त्याचे हे ढळढळीत उदाहरण आहे. एक बडतर्फ शिक्षक जो की, आमच्या शाळेत कार्यरत नाही. मा. उच्च न्यायालयाने त्याच्या न्यायालयीन प्रकरणात तो रूजू नसेल तर 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिले. सध्या तो इतर शाळेत कार्यरत आहे. न्यायालयाच्या आदेशाच्या विसंगत त्या कार्यरत नसणाऱ्या शिक्षकांचे वेतन काढण्यासाठी शिक्षणाधिकारी संस्थेतील शाळेच्या मुख्याध्यापकांना बडतर्फ करण्याचा बनाव करतात. एक वर्ष शाळेतील शिक्षकांचे वेतन रोखतात. संस्थाचालकांच्या, मुख्याध्यापकांच्या विरोधात अनुसूचित जाती-जमाती आयोगाकडे शासनाच्या बाजूने परस्पर खोटी साक्ष देतात. खोटे ॲट्रॉसिटी गुन्हे दाखल करतात आणि हल्ले घडवून आणतात. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांसाठी असलेले अनुदान जाणीवपूर्वक तीन-चार वर्षापासून वंचित ठेवतात. हे सर्व करूनही शाळेचे मुख्याध्यापक, संस्थाचालक शिक्षणाधिकाऱ्याच्या बेकायदेशीर कृत्यास थारा देत नाहीत हे लक्षात आल्यानंतर शिक्षणाधिकारी, शिक्षण संचालक हे संगनमत करून सदर शाळा ताब्यात घेण्यासाठी शाळेवर प्रशासक नेमण्याची कारवाई करतात आणि शिक्षणमंत्रीही त्यातील नियमावलीची शहानिशा न करता त्यास मान्यता देतात.

हे सर्व घडत असताना स्थानिक लोकप्रतिनिधीशिवाय, विधान परिषदेचे ज्येष्ठ सदस्य भाई जयंत पाटील, माजी खासदार ब्रिगेडियर सुधीर सावंत, शिवसेनेचे आमदार संतोष बांगर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संजय बोंढारे यांच्यासह सर्व पक्षाचे लोकप्रतिनिधी यांनी या प्रकरणातील नियमांची शहानिशा करून सर्व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यांचे पत्र, पुरावे सादर केले; पण विद्यार्थी,

शिक्षक, लोकप्रतिनिधी यांच्या पत्राला थारा न देता केवळ अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून नियमबाह्य व बेकायदेशीर कृत्यांवर पांघरूण घालण्यासाठी शालेय शिक्षणमंत्री वर्षाताई गायकवाड यांनी शिक्षण संचालकांचा निर्णय कायम ठेवला ही दुर्दैवी बाब आहे. अधिकाऱ्यांना वाचविण्यासाठी मंत्र्यांना इतकी घाई झाली की, कोरोना काळात जगातील शिक्षण थांबले असताना, शाळा सुरू नव्हत्या, रेल्वे सेवा सुरू नव्हत्या, प्रत्यक्ष सुनावणीस बंदी असतानाही कोरोना काळात दोन वेळा सदर सुनावणी तारीख देण्यात आली होती. मंत्रीमहोदयांनी दिलेल्या निर्णयाबाबत बोलणेच नको. सदर प्रकरणात कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या प्रथम वर्षातील विद्यार्थीपण योग्य निर्णय देईल. संस्थेने, मुख्याध्यापकाने सादर केलेल्या नियमानुसार व कायदेशीर पुराव्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून अधिकाऱ्यांना वाचविण्याचा हा निर्णय असल्याचे लक्षात आल्यानेच मा. उच्च न्यायालयाने या निर्णयास स्थगिती दिली. न्यायालयाच्या या निर्णयामुळे या प्रकरणातील अधिकाऱ्यांना चाप बसला आहे. लोकप्रतिनिधीची बांधिलकी जनतेशी असते. तद्वतच शिक्षणमंत्र्यांची बांधिलकी ही विद्यार्थी-शिक्षकांशी असते व असायला पाहिजे. यापूर्वीचे शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी शालेय शिक्षणात घेतलेल्या अनेक निर्णयाची उलटसुलट चर्चा झाली असली तरी शालेय तपासणी ही समजावून सांगणारी असावी. अधिकाऱ्यांच्या अरेरावीची नसावी, असा एक स्वागतार्ह निर्णयदेखील त्यांनी घेतला होता; परंतु या वेळच्या शालेय शिक्षणमंत्र्यांनी अधिकारी वर्गाच्या अरेरावीला खतपाणीच घातले असेच म्हणावे लागेल. जर अधिकाऱ्यांचे म्हणणे खरे आहे, असे मंत्री म्हणतील व अधिकाऱ्यांचेच निर्णय पूर्वदिशा असतील तर लोकशाही शासन व्यवस्थेत मंत्र्यांचे काय काम ? असा सवाल उपस्थित होतो. कर्मचाऱ्यांच्या आठ-दहा वर्षे विनावेतन काम करणाऱ्या हजारोंच्या संख्येने असणाऱ्या शिक्षक, वेतन अनुदानाबाबत शासननिर्णय घेताना तत्परता दाखविली जात नाही. ती तत्परता केवळ एका शिक्षकास बेकायदेशीरपणे पगार मिळवून देण्यासाठी शिक्षणाधिकाऱ्यापासून ते शिक्षणमंत्र्यापर्यंत सर्वजण दाखवितात, ही शिक्षण क्षेत्रास काळीमा फासणारी बाब आहे. माननीय मुख्यमंत्रीसाहेब, या संपूर्ण प्रकरणात संस्था. शाळा, शिक्षक, विद्यार्थी यांची न भरून निघणारी हानी झाली आहे. तालिबानी

राजवटीने जितका अत्याचार मुलींच्या शिक्षणावर केला नाही त्यापेक्षा अधिक अत्याचार वाझे प्रवृतीच्या काही अधिकाऱ्यांनी शालेय शिक्षण क्षेत्रात केला आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाने त्यांना धक्का बसला. शिक्षण क्षेत्रात सध्या आलबेल आहे. दहा–बारा वर्षे बिनपगारी काम करणाऱ्यांकडून त्यांचा पगार काढण्यासाठी शिक्षणाधिकारी १५–१५ लाख रुपये घेतात. लाचेच्या जाळ्यात अडकतात; पण तरीही त्यांना अभय मिळते. भ्रष्टाचाराच्या प्रकरणात टॉप फाइव्हमध्ये शिक्षण विभाग आहे. ही चिंतेची बाब आहे. अधिकाऱ्यांविरुद्ध कोणीही बोलण्यास तयार नाही. त्यामुळे शिक्षण क्षेत्राच्या शुद्धिकरणाची गरज निर्माण झाली आहे. अधिकाऱ्यांना व त्यांना पाठीशी घालणाऱ्यांना वेळीच आवर घाला नाही तर शिक्षणाचे गुन्हेगारी करणासोबतच तालिबानीकरण होण्यास काही वेळ लागणार नाही. तेव्हा महाराष्ट्राच्या समृद्ध शिक्षण चळवळीची आब राखण्यासाठी राज्याचे प्रमुख या नात्याने आपण लक्ष घालावे ही कळकळीची विनंती. जय महाराष्ट्र..!

**आपला कृपाभिलाषी,**
**सांजवार्ता, दि.८ सप्टेंबर २०२१**

■■

# प्रतिभावंत आंतरराष्ट्रीय शिक्षक आणि कुच्चर अधिकारी

**सचिन** वाझे प्रकरणातून मुंबई पोलीस दलाबरोबरच संपूर्ण महाराष्ट्राची बदनामीची घटना वाझे याच्या ऑटेलिया या इमारतीसमोर ठेवलेले स्फोटक व मनसूब हिरे या निरापराध व्यक्तीची केलेली हत्या व त्यातून तथाकथीत दहशतवादाचा बनावाच्या षडयंत्रामुळे बदनाम झालेली महाराष्ट्र पोलिसाची प्रतिमा ही बदनामी कमी आहे की काय म्हणून राज्यातील शिक्षण विभागातील अधिकारी या पोलीस खात्यातील अधिकाऱ्याच्या प्रवृत्तीचा आदर्श ठेवून आपल्या कर्तृत्वावर जागतिक स्तरावर महाराष्ट्राची किंबहुना देशाचे शिक्षण क्षेत्रात नाव कमावणाऱ्या शिक्षकावर शिक्षणद्रोही हा बनावट बनाव करून जागतिक स्तरावर काम करणाऱ्या शिक्षकावर कारवाईचा बडगा उगारून त्यांना त्यांच्या शैक्षणिक कार्यापासून परावृत्त करण्याचा खटाटोप करण्यात येत आहे. पुणे जिल्ह्यातील वाबळेवाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेला शासनाच्या अर्थसहायबिना जागतिक स्तरावर नामांकित केलेल्या दत्तात्रय वारे गुरूजी यांच्यावर निलंबनाची कारवाई, त्या पाठोपाठ सोलापूर जिल्हयातील कदमवाडी येथील जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक रणजीतसिंह डिसले गुरुजी यांनी अध्यापनात माहिती व तंत्रज्ञानाचे क्युआर कोडच्या माध्यमातून देशाचे जगात नाव लौकीक केलेले व अमेरिका सरकारने त्यांना ग्लोबल टिचर म्हणून सन्मानित केलेले डिसले गुरुजी यांनाही उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत जाण्यास शिक्षण खात्यातील वाझे प्रवृत्तीच्या अधिकाऱ्याने खोडा घालून त्यांची केलेली छळवणूक व बदनामी या दोन घटना अत्यंत क्लेषदायक व महाराष्ट्राची किंबहुना देशाची जगात बदनामी करणाऱ्या घटना आहेत. वाझे प्रकरणाने महाराष्ट्राची फक्त देशातच बदनामी झाली परंतु वारे गुरुजी व डिसले गुरुजी यांच्या प्रकरणाने आधुनिक माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात भारत हा आत्मनिर्भरतेची घोषणा करीत असतांना या आत्मनिर्भर तंत्रज्ञान

शिक्षणात नोकरशाहीची ही प्रतिगामी व हुकूमशाही वृत्ती कलंकित करणारी आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य म्हणून देशात ओळखले जाते. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून या राज्याला परिवर्तनवादी व लोक कल्याणकारी नेतृत्व लाभले. त्यामुळे महाराष्ट्राची शैक्षणिक वाटचाल ही देशातील इतर राज्याच्या तुलनेत अधिक गतीशिल राहिली आहे. परंतु अलिकडे काही वर्षात शिक्षणाविषयी राज्यकर्त्यांच्या उदासिनतेमुळे या क्षेत्रात अधिकाऱ्यांनी अक्षरशः धुमाकुळ घातला असून बेबंद नोकरशाहीमुळे शिक्षण क्षेत्रातील काम करणाऱ्यांचा चांगले शिक्षक व शाळा व संस्थांचा अक्षरशः जीव गुदमरत आहे. शासनाचाही व समाजाचाही शासकीय, जिल्हा परिषद व शासन अनुदानित शाळा विषयी दृष्टीकोन बदलत आहे. समाजही आता या वरील शाळेतील गुणवत्ता ढासळली अशी ओरड करत आहे. अशा परिस्थितीत पुणे जिल्हयातील वाबळेवाडी येथील जिल्हा परिषदेचा कायापालट करून जिल्हा परिषदेच्या शाळेची भौतिक सुविधा व गुणवत्ता ही जागतिक स्तरावर नेवून ठेवली. त्यांच्या कार्याची दखल देशात व जागतिक स्तरावर घेतली असे जिल्हा परिषदेचे शिक्षक दत्तात्रय वारे यांनी शासनाच्या अर्थसहायविना लोकसहभागातून कोट्यावधी रूपयाची जमिन शाळेसाठी दान घेतली. त्यावर अत्यंत भव्य अशी शाळेची इमारत उभी केली. केवळ भौतिक सुविधा उभी न करता अध्यापनाची नवीन पध्दत विकसीत केली. जागतिक स्तरावरच्या भाषा, इंग्रजी भाषा, याचबरोबर संगणकाचे ज्ञान असे जागतिक स्तरावरचं शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेच्या माध्यमातून ग्रामिण भागातील गोरगरीब उपेक्षित समाजाच्या मुलांना जिल्हा परिषदेच्या शाळेच्या माध्यमातून उपलब्ध करून दिले. २ आकडी पटसंख्या असलेल्या या जिल्हा परिषदेच्या शाळेचे रूपडे पालटून जवळपास हजार पटसंख्येजवळ या शाळेची पटसंख्या केली. एखाद्या इंटरनॅशल इंग्लिश स्कुलप्रमाणे या शाळेत प्रवेश घेण्यासाठी परिसरातील पालकांच्या रांगा लागल्या. याची दखल त्यावेळेसच्या राज्य शासन व केंद्र शासनाने घेतली होती दत्तात्रय वारे गुरुजी यांना राष्ट्रपती पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले होते. परंतु जिल्हा परिषदेच्या शाळेतून आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिक्षणाचे ज्ञान मिळते ही बाब धंदेवाईक शिक्षण संस्थेला खुपली आणि शिक्षण खात्यातील भ्रष्ट प्रवृत्तीच्या अधिकाऱ्यांना व राजकारणी व्यक्तींना हाताशी धरून वारे गुरुजी यांच्या विरुध्द बनावट व बिनबुडाचे आरोप

करून त्यांच्याविरुध्द निलंबनाची कारवाई केली. हे महात्मा फुलेंच्या पुणे जिल्हयात घडले ज्या राजकीय लोकांनी वारे गुरुजी यांची विधी मंडळात भरभरून तारीफ केली व वारे गुरुजींचे हे वाबळेवाडीचे मॉडेल राज्यातील सर्व जिल्ह्यात राबविण्याची ग्वाही दिली. तेच राजकीय नेते वारे गुरुजीवर कारवाई होतांना मुग गिळून गप्प होते. अशीच एक दुसरी घटना सोलापूर जिल्हयातील कदमवाडी येथील जिल्हा परिषदेचे सहशिक्षक रणजितसिंह डिसले गुरुजी बाबत घडली. डिसले गुरुजी यांनी क्युआर कोडच्या माध्यमातून माहिती तंत्रज्ञानाचा अध्यापनात वापर करून एक प्रभावी तंत्रज्ञान उभे केले. याचा लाभ विद्यार्थ्यांना अध्यापनाच्या प्रक्रियेमध्ये अत्यंत प्रभावी ठरू लागला. याची दखल ना राज्य शासनाने घेतली ना देशाने घेतली. परंतु याची दखल अमेरिका सरकारतर्फे त्यांना ग्लोबल टिचर या अवॉर्डने सन्मानित करून त्यांना ७ कोटी रूपयाचे बक्षिस देण्यात आले. डिसले गुरुजी यांनी यातील ३ कोटी रुपये या क्षेत्रातील काम करणाऱ्या जगातील शिक्षकांना दान केले. शिक्षण क्षेत्रात स्वतंत्र भारताच्या इतिहासात एखाद्या शिक्षकाला जागतिक स्तरावरचा बहुमान मिळण्याची ही पहिलीच घटना असेल. याचा अभिमान महाराष्ट्र व देशाला असायला पाहिजे होता. परंतु या ग्लोबल टिचरच्या कार्यकर्तृत्वाचा सन्मान करणे दूरच परंतु डिसले गुरुजी यांना उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत जाण्यासाठी दीर्घ मुदतीच्या रजा मिळण्यात शिक्षण खात्यातील अधिकाऱ्यानी खोडा घातला इतकंच नव्हे तर या ग्लोबल टिचरवर बिनबुडाचे, निरर्थक आरोप करून त्यांना बदनाम करण्याचे कारस्थान सुरू आहे. शिक्षणमंत्री व लोकप्रतिनीधीही डिसले गुरुजींच्या उच्च शिक्षणात कोणताच अडथळा येणार नाही याची जाहीर ग्वाही देतात परंतु प्रत्यक्षात तसे घडतांना दिसत नाही. अधिकाऱ्यांच्या वसुली प्रवृत्तीने मिंधे झालेले लोकप्रतिनिधी मात्र या अधिकाऱ्यावर कोणतीच कारवाई करीत नाही. वारे गुरुजी, डिसले गुरुजी यांच्यावर शिक्षण खात्यातील उन्माद व हुकूमशाही प्रवृत्तीच्या अधिकाऱ्यांचे हे कृत्य देशासाठी लाजिरवाणी गोष्ट आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर तंत्रशिक्षणाच्या माध्यमातून व आपल्या प्रतिमेच्या जोरावर देशाचे नाव लौकीक केलेल्या शिक्षकांना शिक्षण खात्यातील अधिकारशाहीकडून इतका छळ होत आहे हे पाहून शिक्षण क्षेत्रात प्रामाणिक काम करणाऱ्या शिक्षकांचे मनोबल या घटनेमुळे निश्चितच कमी होणारे आहे. आज शिक्षण क्षेत्रातील सुपारीखोर

अधिकाऱ्यांचा धुमाकूळ चालू आहे. राज्यकर्ते सत्ता राजकारणात गुंग आहेत. त्यामुळे या अधिकाऱ्यांवर कोणाचाच वचक नाही. अलिकडेच शिक्षण क्षेत्रात बोगस शिक्षक पात्रता परिक्षेचे प्रकरण उघडकीस आले. या प्रकरणातून शिक्षण क्षेत्रातील खालच्या अधिकाऱ्यापासून शिक्षण संचालकापर्यंतचे वरिष्ठ अधिकारी कसे गुंतले हे आपण पाहिले आहे. हे प्रकरण अपवादात्मक आहे की, शिक्षण संचालकाच्या पदावरील अधिकाऱ्यांना बेड्या घातल्या. हे प्रकरण सोडले तर सुडबुद्धीने चुकीच्या पध्दतीने कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांविरूद्ध आजपर्यंत कठोर कारवाई झाल्याचे प्रकरण पहावयास मिळत नाही. पोलीस खात्यात एखाद्या अधिकाऱ्याने बनावट इनकाउंटरद्वारे एखाद्याची हत्या केल्यास त्या दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांविरूध्द खुनाचा खटला दाखल होतो व खातेनिहाय चौकशी होते. पोलिसांच्या अत्याचाराने बळी ठरलेल्या व्यक्तीचे व त्याच्या कुटुंबियाचे नुकसान हे एका कुटूंबियापर्यंतय मर्यादित असते. पण शिक्षण खात्यातील चांगले प्रतिभावान शिक्षक गुणवत्तापूर्ण शैक्षणिक कार्य करणाऱ्या शाळा व संस्थेवर कारवाई केल्यास होणारी हानी ही त्या शिक्षक व शाळेपुरती मर्यादित नसते. त्या परिसरातील एका पिढीचे आयुष्य उध्दवस्त होते. याचे गांभिर्य ओळखून राज्यकर्त्यांनी चुकीच्या पध्दतीने व नियमबाह्य कार्य करणाऱ्या शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांविरुद्ध फौजदारी व खातेनिहाय चौकशीचे कठोर कायदे अस्तित्वात आणण्याची गरज आहे व त्याची अंमलबजावणी ही तात्काळ होणे गरजेचे आहे व जनतेनेही शिक्षणाबाबतीत जागृक असणे गरजेचे आहे. तर गरीब, कष्टकरी व उपेक्षित समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी काम करणारे प्रतिभावंत शिक्षक तळमळीने शिक्षण क्षेत्रात काम करतील. अन्यथा बहुजनासाठी निर्माण झालेली ही शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त होईल. डिजीटल आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकारण्यासाठी शिक्षण क्षेत्रात कठोर कायद्याची गरज निर्माण झाली आहे.

(दैनिक हाबाडा)

■■

# शासनाकडूनच शिक्षणाची 'शाळा'

**आधुनिक** जगाच्या इतिहासात प्रथमच कोरोना जागतिक संसर्गाचे कारण पुढे करुन शाळा बंद ठेवून गेल्या दीड वर्षापासून बालकांच्या शिक्षणाच्या मुलभूत हक्कापासून वंचित ठेवण्याचे षडयंत्र, डिजीटल क्षेत्रातील कंपन्या व शासनकर्ते करत आहेत. शिक्षण क्षेत्रावर न भुतो असे संकट निर्माण झालेले आहे. (की हे संकट निर्माण केले गेले आहे ?) बालकांच्या शिक्षणाच्या मुलभूत हक्कांचा गळा घोटण्याबरोबरच शिक्षकांच्या अस्तित्वावरही प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. गेल्या दीड वर्षापासून शाळा बंद असल्याने पालकांना आता शाळा व शिक्षणाचे महत्व पटू लागले आहे. काही दशकांपासून शिक्षकाची समाजाशी तुटलेली नाळ पुन्हा दृढ करण्यासाठी या संकट प्रसंगी शिक्षकांसाठी ही नामी संधी निर्माण झाली आहे. अशावेळी शिक्षकांनी कोरोनाचे वास्तविक सत्य, वैज्ञानिक दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून समाजासमोर मांडावेत व शाळा सुरू करण्याबाबत लोकचळवळ उभी करावी. अन्यथा जगामध्ये अनेक स्थित्यंतरे झाले आहेत. काळानुरूप बदल न स्विकारणारा घटक हा पडद्या आड गेल्याचा इतिहास आहे. शिक्षक दिनी शिक्षकाच्या कोरोना लसीकरणापेक्षा शाळा सुरू करणे ही खरी समाजाची व देशाची गरज आहे.

गेल्या काही दशकापासून शासकीय व शासन अनुदानित शाळामध्ये गुणवत्ता व दर्जेदार शिक्षण मिळत नाही अशी धारणा समाजाची झाल्याने खासगी शिक्षण संस्था व खाजगी शिकवणी संस्थेचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात उभे राहिले आहे. शासकीय व शासन अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या ही निम्म्यावर आलेली आहे. खाजगी शिक्षण संस्थेमध्ये विद्यार्थ्यांचा कल वाढला आहे. शिक्षकाप्रती समाजामध्ये फारशी प्रतिष्ठा राहिली नाही. शिक्षक हे आता साने गुरुजी ऐवजी 'नाणे गुरूजी' झाले अशी भावनाही समाजाची आहे. तसेच शासनासही शिक्षणासाठी

खर्च करण्याची मानसिकता राहिली नाही. कोरोना हे मात्र निमित्त आहे. कोविडच्या कार्यकाळात शासनाने ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय उपलब्ध करुन दिला होता. परंतु ७० टक्के विद्यार्थी हे प्रत्यक्ष ऑनलाईन शिक्षणापासून वंचित राहिले हे वास्तव आहे. या काळात जिल्हा परिषद व खाजगी शाळेतील काही शिक्षकांनी घरोघरी जावून ग्रामीण व दुर्गम भागातून विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य केल्याचे चित्र टाळेबंदीच्या काळात समोर आले. या विपरीत खाजगी शाळा व खासगी क्लासेसने अशा संकट प्रसंगीही पालकांची कशी आर्थिक लूट केली हेही समाजाने पाहिले. लॉकडॉउनमध्ये शिथिलता आल्यानंतर ग्रामीण भागातील शाळा सुरू झाल्या. ज्या भागात कोविड काळामध्ये शिक्षकांनी घरोघरी जावून अध्यापन केले त्या भागातील शाळेतील पटसंख्या वाढल्याचे दिसून येत आहे. प्रथमत:च कोविड संकटाच्या निमित्ताने का होईना ग्रामीण भागातील पालकांचे आपल्या परिसरातील जिल्हा परिषद व अनुदानित शाळेबदल सकारात्मक दृष्टीकोन पाहावयास मिळाला. या पालकांच्या विश्वासाला अधिक वृंध्दिगत करण्यासाठी शिक्षकांनी अधिक जबाबदारीने राहण्याची गरज आहे. इंटरनेट व डिजिटल युगात ही प्रचलित शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त करण्याचा डाव जागतिक स्तरावर आखला जात आहे. अशा परिस्थितीत जगातील सर्व ज्ञान एका मुठीत बंदीस्त झाले आहे. पूर्वी माहिती व ज्ञानासाठी विद्यार्थ्याला व समाजाला शिक्षकाकडे जावयास लागत होते. पण आता घरबसल्या ही माहिती एका क्लिकवर त्यांना मिळते. त्यामुळे शिक्षकांनी ज्ञानवृध्दीबरोबरच तंत्रज्ञान जपले पाहिजे.

भारताच्या प्राचीन शिक्षण व्यवस्थेत शिक्षकाचे स्थान सर्वात उच्च होते. शिक्षकाच्या पाच श्रेण्या सांगितल्या जातात. १. अध्यापक–माहिती देणारा, २. उपाध्याय– माहितीच्या आधारे माहितीची जोड देतो. ३. आचार्य – माहिती बरोबर कौशल्य शिकवतो, ४. पंडित– जो सखोल ज्ञान देतो, ५.गुरू–विवेक व बुध्दिमत्ता देतो. वरील १ व २ चे काम आता मोबाईल करीत आहे. प्रत्येक शिक्षक हा आचार्य, पंडित व गुरू झाला पाहिजे. आपण काळानुरूप बदल घडवून आणला नाही तर आपले अस्तित्वच संपेल हे अनेक स्थित्यंतराने दाखवून दिले आहे. जसे यंत्राच्या शोधामुळे १२ बलुतेदारी संपली. स्वावलंबी ग्रामीण अर्थव्यवस्था नष्ट झाली. त्याच प्रमाणे सध्याच्या कोरोनाच्या आड डिजिटल कंपन्या हया प्रचलित शिक्षण व्यवस्थेतील शिक्षकाला हद्दपार करण्याचा घाट

घालत आहेत. शासनासही शिक्षणाच्या जबाबदारीतून मुक्त व्हायचे आहे. त्यामुळे शिक्षकांनी या संकटाचे गांभीर्य ओळखून कोरोनाच्या आड जो काही खेळ सध्या चालू आहे त्याचे आपल्या सद्सदविवेक बुध्दीला पटेल असे वैज्ञानिक सत्य जनतेसमोर, समाजासमोर मांडून शाळा सुरू करण्यासंदर्भात लोक लढ्याचे नेतृत्व शिक्षकांनी केले पाहिजे.

राज्यकर्ते कोरोनाची भीती दाखवून शाळा बंद ठेवून शिक्षकांना घरबसल्या पगार देत आहेत. हे आज जरी शिक्षकाला चांगले वाटत असले तरी भविष्यात शिक्षकांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होणार आहे. या संकटाचे गांभीर्य ओळखून शिक्षकांना ज्ञानवंत, प्रज्ञावंत, दानवंत व त्यागवंत व्हावे लागेल. दक्षिण आफ्रिकेतील एका विद्यापीठाच्या कोणशिलावरील एक संदेश या सध्याच्या परिस्थितीला लागू होतो म्हणून देत आहे. 'एखाद्या राष्ट्रास नेस्तनाबूत करावयाचे असल्यास त्या देशावर बॉम्ब वर्षाव करण्याची गरज नाही, तेथील शिक्षण व्यवस्था खिळखिळी केल्यास ते राष्ट्र आपसुकच नष्ट होते'. भविष्यात शिक्षकांनीच शिक्षण व शिक्षक टिकून ठेवावेत. शिक्षक दिनी शिक्षकाकडून हीच एक अपेक्षा.

**जाता.....जाता....**

महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. बहुजन व वंचितांना शिक्षण मिळावे यासाठी महात्मा फुलेंनी केलेली चळवळ, छत्रपती शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान हे देशाला मार्गदर्शक ठरले आहे. अशा पुरोगामी महाराष्ट्रात फुलेंनी ज्या वर्गापासून बहुजनाच्या शिक्षणाला धोका आहे हे सांगितले होते. ते आताच्या महाराष्ट्रातील नोकरशाहीच्या प्रवृत्तीतून दिसून येते. प्राथमिक शिक्षक रणजितसिंह डीसले गुरुजी यांनी निर्माण केलेल्या क्युआर कोर्डिंगची दखल जागतिक स्तरावर घेवून त्यांना गतवर्षी ७ कोटी रूपयाचा जागतिक शिक्षक पुरस्कार देवून गौरविण्यात आले, वाबळेवाडी जि. पुणे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेचा कायापालट तेथीलच शिक्षकांच्या सामुहिक प्रयत्नातून घडवून आणून सदर शाळा जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर पोहोचवली.

शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या अशा असंख्य गुरूजींची नोंद शासन स्तरावर घेण्यात येत नाही. परंतु अवैध धंद्यात गुंतलेल्या एखाद्या शिक्षकास राष्ट्रपती पुरस्कार मिळतो कसा ?, अशी खंत एका तत्कालीन माजी सहकार मंत्री यांनी

अनेक वेळा आपल्या भाषणातून व्यक्त केली आहे. प्रामाणिक कार्य करणाऱ्या शिक्षक व संस्थेची भ्रष्ट प्रवृत्तीचे अधिकारी दखल घेत नाहीत. म्हणूनच ८ लाख रुपये– लाच घेणाऱ्या शिक्षण अधिकाऱ्याविरुद्ध कोणतीच कारवाई होत नाही आणि शिक्षण क्षेत्रात भ्रष्टाचार बोकाळला असतांनाही त्याचा पाहिजे तितका बोभाटा होत नाही, ही महात्मा फुले, शाहू, आंबेडकरांच्या महाराष्ट्राची शोकांतिका आहे.

'शाळा करणे' या शब्दाचा अर्थ खालीलप्रमाणे घ्यावा. ('शाळा करणे' असा एक वाक्यप्रचार 'वाट लावणे' अशा अर्थाने बरेच लोक वापरतात, अगोदर जनता सरकारकडे 'मायबाप' म्हणून बघायची, आता सरकार भांडवलशाहीकडे जास्त झुकते आहे, फायद्या तोट्याकडे बघत आहे, सामान्यातील अतिसामान्य व्यक्ती देखील आपल्या पाल्यांना दहा– विस किलोमीटर दूर इंग्रजी माध्यमाच्या शाळेत पाठवत आहे. हेही शासनाच्या लक्षात आल्यानंतर शासनाने शिक्षण क्षेत्रातून काढता पाय घेण्यास सुरुवात केली, मोठ्या प्रमाणात इंग्रजी शाळांना मान्यता देणे, विविध कारणे दाखवून शासकीय व अनुदानित शाळा महाविद्यालयात पदे कमी करणे, व्यपगत करणे, पदभरती खोळंबत ठेवणे, ऑनलाईन शिक्षणाला पोषक वातावरण जाणीवपूर्वक तयार करून बहुजनांच्या शिक्षणावर आघात करणे आदी प्रकार होत असल्याने शासनच – शिक्षणाची 'शाळा' करीत आहे. असेच म्हणावे लागेल.)

(दैनिक कृषीवल– १० ऑक्टोंबर २०२१)

■■

# बालहक्क कायद्याची दशा आणि दिशा

**बालकांच्या** हक्काच्या संदर्भात जगात पहिल्या महायुद्धानंतर युनाटेड किंगडममध्ये प्रथम चळवळ उभी राहिली. युध्द व देशोदेशातील संघर्षामुळे मोठ्या प्रमाणावर जिवित व वित्त हानी होते. यापेक्षा गंभीर बाब म्हणजे या युध्दात व या संघर्षात नाहक बालकांचा बळी जातो. युद्धानंतर उद्भवलेल्या परिस्थितीत भूकबळी, कुपोषण व साथीच्या रोगाने ही बालके मोठ्या प्रमाणात दगावतात. त्याचा प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष परिणाम त्या–त्या देशांच्या भविष्यावर होत असतो. म्हणून युनाटेड किंग्डम येथील बालकाच्या हक्क चळवळीचे नेते एग्लेटाईन जेब यांनी पहिले महायुद्ध संपल्यानंतर 'सेव्ह द चिल्ड्रन' ही चळवळ सुरू केली.

या चळवळीची दखलनंतर संयुक्त राष्ट्र संघाने घेतली. कोणतेही युध्द होवो या युद्धात बालकांच्या जिवितास व हितास कोणतीच बाधा येणार नाही असा कायदा संमत करण्यात आला. स्वातंत्र्यापूर्वी १९३१ मध्ये 'सेव्ह द चिल्ड्रन' या चळवळीच्या घोषणापत्रावर महात्मा गांधी यांनी स्वाक्षरी केली होती. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. २६ जानेवारी १९५० ला भारताची राज्य घटना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकांना अर्पण केली. संविधानाची मुलतत्वे प्रमुख स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व न्याय हे खरोखर या घटनेत भारतीय समाजातील सर्व घटकाच्या हक्काचे संरक्षण धर्म, जात, लिंग, भेद, याचा विचार न करता करण्यात आले. त्यात बालकांच्या संरक्षणाच्या हक्काची जाणीवपूर्वक काळजी भारतीय संविधानात घेण्यात आली.

बालकांचे अस्तित्व, स्वातंत्र्य, आरोग्य व शिक्षण यांचे यात संरक्षण करण्यात आले व याची संपूर्ण जबाबदारी देशाच्या राज्यकर्त्यांवर सोपविण्यात आली. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या संदर्भात वयोगट ६ ते १४ बाबतीत

संविधानाच्या अनुच्छेद २१ ए नुसार तरतूद करण्यात आली. अनुच्छेद २४ नुसार धोकादायक क्षेत्रात मुलांना काम करण्यास प्रतिबंध करण्यात आला. अनुच्छेद १४ अनुसार प्रौढ नागरिकाप्रमाणे बालकांना अधिकार प्रदान करण्यात आले. राज्य घटनेच्या परिच्छेद २३ अन्वये बाल संरक्षण कायदा संविधानानुसार बालकांना प्राप्त झाला. स्वतंत्र भारताच्या राज्य घटनेत सर्वार्थाने बालकाचे त्याच्या हक्का संदर्भाचे संरक्षण करण्यात आले. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांच्या कार्यकाळात केंद्र व राज्य शासनाने आजपर्यंत २५० कायदे तयार केले. या कायद्याचा लाभ किती प्रमाणात झाला? याबाबत समाजात मत प्रवाह असू शकतील पण या कायद्याच्या अनुषंगाने बालकामगार, बालविवाह, बाल कुपोषण, बाल तस्करी, अल्पवयीन मुलीस गैरमार्गाने वेश्या व्यवसायात ढकलणे आदी प्रवृत्ती रोखण्यास या कायद्यामुळे बऱ्यापैकी यश आल्याचे दिसून येते.

१९९०च्या दशकापर्यंत शहर, ग्रामीण भागात हॉटेल व्यवसाय, कारखाने, धोकादायक क्षेत्रात जे बाल कामगाराचे चित्र दिसत होते, ते आता दिसत नाही. यास हे कायदेही कारणीभूत आहेत. पूर्वी कष्टकरी व गरिबांची मुले अक्षर ओळख होण्याच्या अगोदरच शाळेतून काढता पाय घेत होते. परंतु, मध्यान्ह भोजन, अंगणवाड्या यामुळे हे प्रमाण बरेचशे कमी झाले व बालकांचे साक्षरतेचे प्रमाण वाढले.

तरी पण जागतिक स्तरावरील बालकांच्या हक्कासंदर्भात आपला देश मागेच आहे. महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी व कल्याणकारी राज्य म्हणून ओळखले जाते. तरी पण बालकाच्या कुपोषणाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य हे देशाच्या अग्रस्थानी आहे. राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोगाने (एनसीपीआर) २०१९- २० मध्ये सर्वेक्षण केले. त्यानुसार गेल्या पाच वर्षांच्या तुलनेत अतिकुपोषणाच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली. नोव्हेंबर २०२० मध्ये देशात सुमारे ९ लाख २७ हजार अतिकुपोषित बालके होती. ऑक्टोबर २०२१ मध्ये ही संख्या १७ लाख ७६ हजारांवर गेली. यात महाराष्ट्रात ६ लाख १६ हजार कुपोषित बालके होती.

ग्लोबल हंगर इंडेक्समध्ये २०२०-२१ मध्ये भारताचे स्थान १०१ वर होते. यावरून असे लक्षात येते की, बालकाच्या सर्वात प्राथमिक गरजा पुरविण्यात शासकीय यंत्रणा किती असंवेदनशील आहे हे यावरून दिसून येते. केवळ

कायदे करून प्रश्न सुटत नाही. शासकीय यंत्रणाही समाज व देशाप्रति संवेदनशील असणे गरजेचे आहे.

स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षांच्या कार्यकाळात देशात बालकांच्या हितासाठी व कल्याणासाठी काही झाले असे नाही पण जागतिक स्तराचा विचार केल्यास आपल्या देशाचे स्थान हे किती खालच्या पातळीवर आहे हे यावरून दिसून येते. त्यासाठी नागरिकांनी जागरूक राहणे गरजेचे आहे व राज्यकर्त्यांनी प्रशासकीय पातळीवर त्या योजनांची अंमलबजावणी होते की नाही हे पाहणेही तेवढेच गरजेचे आहे.

या ठिकाणी बालकाच्या कुपोषणाचा विषय हा प्रातिनिधिक स्वरूपाने घेण्यात आला. जन्मलेला बालक हा प्राथमिक अवस्थेत कुपोषित असेल तर त्या देशाचे भवितव्य कसे राहील याचा विचार करणेही आवश्यक आहे. बालकाचे पोषण, आरोग्य ही प्राथमिक गरज आहे. त्यानंतर त्या बालकाचे स्वातंत्र्य, शिक्षण, त्याच्या जीवनाचा आनंद हा नंतरचा प्रश्न ?

भारतीय संविधानात बालकांच्या मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा हक्क दिला असताना तो कायदा प्रत्यक्ष २००९ मध्ये अस्तित्वात आला. पण समानतेच्या शिक्षणाला यात छेद देण्यात आला.

याचे उदाहरण म्हणजे युनिसेफच्या कायद्यानुसार युद्ध, संघर्ष किंवा नैसर्गिक आपत्तीच्या काळातही कुठल्याही परिस्थितीत बालकांच्या शिक्षणाचा हक्क हिरावून घेण्यात येणार नाही, असे स्पष्ट असतांना कोरोना जागतिक महामारीचे संकट पुढे करून ऑनलाईन शिक्षणाचा घाट घालण्यासाठी सुमारे दोन वर्षे देशातील बालकांचा शिक्षणाचा हक्क हिरावून घेण्यात आला.

शाळा सुरू करायची म्हणले की, कोरोनाचे भय दाखविण्यात येत होते. परंतु, राज्यकर्त्यांनी सत्ता कारणासाठी निवडणुका, प्रचार यावर कोणतेच बंधन आणले नाही.  राजकीय हित साधण्यासाठी सभांचा धुराडा उडविला. राजकीय लोकांसाठी ऑनलाईन सभेचे कोणतेच आयोजन करण्यात आले नव्हते. राज्यकर्त्यांच्या या दुटप्पी धोरणामुळे कोरोना महामारीच्यानंतर सुमारे ५ ते १० टक्के बालके शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर गेली. बालकांच्या कुपोषणाच्या प्रमाणातही लक्षणीय वाढ झाली. बालविवाहाचे प्रमाणही वाढले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर एके ठिकाणी म्हणतात, भारतीय राजकीय पक्षांनी/सत्ताधाऱ्यांनी लोकशाही

स्वातंत्र्यांचा वापर केवळ सत्ता कारणासाठी केला न पाहिजे. सत्ताकारणापेक्षा समाजकारण डोळ्यासमोर ठेवून कायदे केल्यास भारतीय लोकशाही टिकून राहील व देशाची प्रगती होईल. बालकांच्या हक्कासंदर्भात राज्यघटनेच्या विविध अनुच्छेदात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बालकांचे सर्व हक्क अबाधित ठेवले आहे. परंतु, सत्ताधिशांनी निवडणुकीवर डोळा ठेवून बालकांच्या हक्कासंदर्भात २५० पेक्षा अधिक कायदे केले खरे पण त्यांनी अंमलबजावणीकडे मात्र दुर्लक्ष केले. त्यामुळेच जागतिक स्तरावर आपली बालकांच्या हक्कासंदर्भाची अहवेलना जगासमोर येत असते.

कोणत्याही देशाच्या प्रगतीत त्या देशातील भौगोलिक परिस्थिती, पर्यावरण, नैसर्गिक साधनसंपत्तीबरोबरच मनुष्यबळ हे महत्त्वाचे असते. म्हणून प्रगत राष्ट्रामध्ये जन्माला येणारा प्रत्येक बालक हा केवळ एखाद्या विशिष्ट कुटुंबांचाच नसतो तर तो देशाचा घटक असतो. या अनुषंगाने आज प्रगत राष्ट्रांमध्ये बालकांच्या हक्कासंदर्भात त्या–त्या देशांतील शासन अत्यंत संवेदनशील आहे.

(सामना– २७ जुलै २०२२)

■■

# आव ग्लोबल शिक्षणाचा, अंमलबजावणी संकुचित विचारांची

**हिंदुस्थानला** जागतिक महासत्ता बनवणे, हे या धोरणाचे अंतिम उद्दिष्ट आहे. 'इस्रो'चे माजी अध्यक्ष के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमली. या कमिटीने चार वर्षे अभ्यास करून देशातील विविध प्रांतांतील शिक्षणतज्ज्ञांची मते मागून चर्चा करून नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० आणले. आपले नवीन शैक्षणिक धोरण –२०२० हे कितीही क्रांतिकारक आणि जागतिक स्तरावरचे असले, तरी अंमलबजावणी करणारी यंत्रणा व शासनकर्ते हे मात्र आपल्या कृतीतून युवा पिढीला मध्ययुगीन युगाकडे ढकलत असल्याचेच दिसत आहे. त्यामुळे आपले नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे कितीही चांगले असले, तरी आपण जगातील महासत्ता होऊ हे दिवास्वप्न राहणार आहे!

भाजपप्रणीत केंद्रातील सरकार कोणतेही धोरण राबविताना देशाच्या नागरिकांचा, युवकांचा विचार न करता केवळ सत्तेवर राहण्यासाठी मतांचे ध्रुवीकरण करून आपली व्होट बँक कशी मजबूत होईल, यासाठीच धोरण राबवित आहे. सरकारच्या अर्थनितीसह विविध धोरणांमुळे झालेल्या नुकसानीपाठोपाठ आता देशाला जागतिक महासत्ता बनविण्याच्या उद्देशाने 'इस्रो'चे माजी अध्यक्ष के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात आलेल्या नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंमलबजावणीच्या प्रारंभीच्या टप्प्यात शिक्षण क्षेत्रातही विद्यमान केंद्र सरकार मतांचे राजकारण आणण्याचेच धोरण राबवित असल्याची टीका होत आहे.

अलीकडे दिल्ली विद्यापीठाने नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सन २०२२–२३ शैक्षणिक वर्षापासून सुरू केली. त्यातील काही शाखांतील अभ्यासक्रम हा सुमार दर्जाचा असून त्यात द्वेषपूर्वक, भेदभाव पद्धतीने काही प्रकरणे वगळली तर काही प्रकरणे त्यात समाविष्ट करण्यात आली. अशा दर्जाहीन अभ्यासक्रमांमुळे जगात काय देशातही असा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या

युवकांना रोजगार मिळणार नाही. असा दिल्ली विद्यापीठातील काही विद्यार्थी संघटना व प्राध्यापक संघटनांचा आरोप आहे. या धोरणाविरुद्ध विद्यार्थी व प्राध्यापक संघटनांनी आंदोलन पुकारले आहे. शिक्षण हा देशाचा कणा असतो. केवळ सत्तेसाठी सत्ताधारी पक्ष हा कणा मोडत असेल तर देशातील युवकांचे व देशाचे भवितव्य निश्चितच अंध:कारमय आहे. नेमके नविन राष्ट्रीय शिक्षण धोरण काय आहे व त्याची अमलबजावणी कशी होत आहे. यावर ओझरता प्रकाश टाकण्याचा अल्पसा प्रयत्न....

स्वतंत्र हिंदुस्थानच्या इतिहासात शिक्षणाच्या ध्येय–धोरणातील नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हा तिसरा मोठा बदल आहे. १९६८ ला इंदिरा गांधी सरकारने पहिला शैक्षणिक बदल १० अधिक २ अधिक ३ असे मांडले. १९८६ ला राजीव गांधी सरकारने दुसरे शैक्षणिक धोरण मांडले. परंतु, त्याची अंमलबजावणी ही १९९२ मध्ये पी.व्ही. नरसिंहराव सरकारने त्यात काही सुधारणा करून अमलात आणली. २०१५ मध्ये मनुष्यबळ विकासमंत्री स्मृती इराणी यांनी टीएसआर सुब्रह्मण्यम यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमून नवीन शैक्षणिक धोरण मांडले. परंतु ते मंजूर झाले नाही. त्यानंतर इस्त्रोचे माजी अध्यक्ष के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमली. या कमिटीने चार वर्षे अभ्यास करून देशातील विविध प्रांतांतील शिक्षणतज्ज्ञांची मते मागून चर्चा करून नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०मध्ये आणले. हिंदुस्थानला जागतिक महासत्ता बनवणे हे या धोरणाचे अंतिम उद्दिष्ट आहे. पूर्वीच्या १०+ २ + ३ धोरणात बदल करून ५ + ३ + ३ + ३ + ४ हे महत्त्वपूर्ण सूत्र या नवीन धोरणाने आणले आहे.

EXIT-1 DIPLOMA -Year1, EXIT- 2 ADVANCE DIPLOMA- Year 2,
EXIT-3 DEGREE - Year 3

पाचमध्ये पूर्वप्राथमिक शिक्षणाचा समावेश आहे. इयत्ता पाचवीपर्यंत शिक्षण हे मातृभाषेत राहणार आहे. शाळेची व घरची भाषा एकच असल्याने बालकाला शिक्षणाचे आकलन सहज व सोपे जाईल. इयत्ता सहावीमध्ये अन्य भाषा व कौशल्य विकासाला महत्त्व दिले आहे. त्यामुळे एखाद्या विषयात त्याला कौशल्य प्राप्त झाल्यास तो सहावीपासूनच मार्ग शोधेल, असे त्यामागचे उद्दिष्ट आहे.

बारावीपर्यंत कोणतेही विषय असले, तरी उच्च शिक्षणात कोणतीही शाखा कोणतेही विषय घेण्यास अडचण येणार नाही.

विज्ञानातील फिजिक्स किंवा गणित अभ्यासणारा विद्यार्थी कला शाखेतील राज्यशास्त्र, इतिहास व अन्य कोणतेही विषय घेऊ शकतो. पूर्वी पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांने आपल्या परिस्थितीमुळे एक वर्ष किंवा दोन वर्षे शिक्षण सोडल्यास त्याला पदवी मिळत नसे. परंतु या नवीन धोरणानुसार एखाद्या विद्यार्थ्याने उच्च शिक्षणात एक वर्ष पूर्ण केले, तरी त्याला प्रमाणपत्र, दोन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास पदविका प्रमाणपत्र मिळण्याची तरतूद आहे. या नवीन धोरणात क्रीडाला प्राधान्य देण्यात आले आहे. हिंदुस्थानी कला, संस्कृती परिसराचा इतिहास याची माहिती शालेय स्तरापासूनच विद्यार्थ्यांना व्हायला पाहिजे, यासाठी विविध कला कलाकृती साकारणारे कलावंत, चित्रकार व शिल्पकार यांना शालेय स्तरापासून ते उच्च शिक्षणापर्यंत त्यांच्या ज्ञानाची, कलेची माहिती व्हावी, यासाठी त्यांना या नवीन शैक्षणिक धोरणामध्ये त्या–त्या भागातील, प्रांतातील अशा कलावंतांना सामावून घेतले आहे. देशातील विविध भाषा, विविध संस्कृती, कलागुण यामुळे जगाच्या सांस्कृतिक कला जीवनात हिंदुस्थानला चांगले स्थान मिळू शकेल, असे उद्दिष्ट आहे. पण प्रत्यक्षात कला आणि क्रीडा क्षेत्रातील शिक्षक भरतीवर सरकारने बंदी घातली आहे. आधुनिक तंत्रज्ञान व तंत्रज्ञ मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी त्या अनुषंगाने देशास महासत्ता होण्यासाठी गुणवत्तापूर्ण कौशल्यबद्ध शिक्षण विकसित करणे, विज्ञान, तंत्रज्ञान व औद्योगिक क्षेत्रातील मनुष्यबळाची कमतरता दूर करणे यासाठी शिक्षणामध्ये मोबाईल, लॅपटॉप, व्हर्च्यूअल क्लासरूम, ऑनलाईन शिक्षणाबरोबरच विविध ॲपचा वापर यावर भर देण्यात आला. यासाठी शिक्षकांची वेळोवेळी प्रशिक्षण, जिल्ह्याच्या ठिकाणी बालभवन व इतर सोयी– सुविधांना प्राधान्य देण्यात आले.

इस्त्रोचे माजी अध्यक्ष के. कस्तुरीरंगन यांनी तयार केलेले नवीन शैक्षणिक धोरण जाहीर करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला संबोधित करताना, हिंदुस्थानातील युवकांना या धोरणामुळे ग्लोबल होण्याची संधी निर्माण होणार आहे, असे म्हटले असून या धोरणाच्या अंमलबजावणीस आपण कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली आहे. परंतु प्रत्यक्षात वोट बँक लक्षात घेऊन या धोरणाची अंमलबजावणी करताना धार्मिक ध्रुवीकरण कसे होईल, याची काळजी

या धोरणातून घेतली गेल्याचे अनेक शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे. कारण एनसीईआरटी अभ्यासक्रमातून मुघल शासकांचा इतिहासच गायब करणे, महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रकरण वगळण्यात आले आहे. काही वर्षापूर्वी भाजपची सत्ता असलेल्या एका राज्यात शालेय अभ्यासक्रमात विमानाचा शोध हिंदुस्थानात प्राचीन काळातच लागला होता. अशा स्वरूपाचा धडाही टाकला होता. ही त्यातील काही उदाहरणे आहेत.

३० जून रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी दिल्ली विद्यापीठाच्या शताब्दी वर्ष महोत्सवाच्या सांगता समारोहाच्या कार्यक्रमास गेले होते. ते या कार्यक्रमास येऊ नये म्हणून काही विद्यार्थी संघटनांनी तशी पत्रके विद्यापीठ परिसरात लावली होती. त्याचे कारण की  ईदनिमित्त सुटी असतानाही हा कार्यक्रम घेण्यात आला. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचा विचार करण्यात आला नाही. याशिवाय मणिपुरात हिंसाचार सुरू असल्याने त्या विद्यार्थ्यांचाही विचार करण्यात आला नव्हता. विद्यार्थ्यांना मात्र या कार्यक्रमास उपस्थित राहण्यासंदर्भात सक्ती करण्यात आली होती. कार्यक्रमास उपस्थित असणाऱ्यांसाठी पाच दिवसांची आगाऊ उपस्थिती मान्य करण्यात आली होती. विशेष म्हणजे या कार्यक्रमासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांनी काळे कपडे घालू नये, असे फर्मानही विद्यापीठातर्फे काढण्यात आले होते. काही विद्यार्थी नेत्यांना अटकही केली होती. आपला अभ्यासक्रम जागतिक दर्जाचा आहे. असे म्हणताना पंतप्रधानांच्या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारू नयेत, इतकेच काय या कार्यक्रमासाठी कोणते कपडे घालून यावे, यावरही बंधन म्हणजे आपलं नवीन शैक्षणिक धोरण २०२० हे कितीही क्रांतिकारक आणि जागतिक स्तरावरचे असले, तरी अमलबजावणी करणारी यंत्रणा व शासनकर्ते हे मात्र आपल्या कृतीतून युवा पिढीला मध्ययुगीन युगाकडे ढकलत असल्याचेच दिसत आहे. त्यामुळे आपले नवीन शैक्षणिक राष्ट्रीय धोरण हे कितीही चांगले असले तरी आपण जगातील महासत्ता होऊ. हे दिवास्वप्नच राहणार आहे.

(सामना– दि. १० सप्टेंबर २०२३)

■■

# शिक्षण प्रेरणा परीक्षा द्या !

**केवळ** शिक्षणच नव्हे आर्थिक, कृषी, सामाजिक व इतर क्षेत्रातील प्रगतीसाठीही त्या त्या खात्यातील कर्मचारी अधिकारी व मंत्र्यांसाठी प्रेरणा परीक्षा किंबहुना स्वयं मूल्यमापन परीक्षा सुरू करण्यात याव्यात. काही वर्षांपूर्वी शासनातर्फे स्वतंत्र अशी विद्यार्थी पट पडताळणी मोहीम राबविण्यात आली होती. अशीच मोहीम सार्वजनिक बांधकाम विभाग, रस्ते विभाग, कृषी व महसूल अन्य विभागातही राबवली पाहिजे तरच देशाची प्रगती होईल. ‘एक देश, एक संविधान’ या संकल्पनेप्रमाणे केवळ शिक्षणावर म्हणजे शिक्षकावर नवनवे प्रयोग न करता ते सर्वच विभागाच्या कर्मचाऱ्यांवर करण्यात यावे म्हणजेच देशाचा सर्वांगीण विकास होईल.

कोणत्याही देशाच्या किंवा राष्ट्राच्या प्रगतीत सर्वच घटकाचा सहभाग असणे हे महत्त्वाचे असते, त्यातल्या त्यात राज्यकर्ते व शासनातील जे घटक असतात ते महत्त्वाचे असतात. जसे की लोकप्रतिनिधी, नोकरशाही व न्यायपालिका या देशाप्रती व देशातील नागरिकांप्रति प्रामाणिक व संवेदनशील असतील तर त्या देशाची प्रगती झपाट्याने होते. अलीकडे असे लक्षात आले, की शिक्षणातील शिक्षक या घटकालाच स्वयं मूल्यमापन या गोंडस नावाखाली शिक्षक प्रेरणा परीक्षा शिक्षकाचे ज्ञान तपासण्यासाठी शासनस्तरावर एक अजब परीक्षा घेतल्या जात आहे. या परीक्षा शिक्षकांसाठी सक्तीच्या नाही स्वइच्छेने द्यावे, असेही प्रशासनाकडून आवाहन करण्यात येत आहे. अनेक शिक्षक संघटनांनी या परीक्षेत विरोध केला आहे. त्यातील महत्त्वाचे कारण हे आहे की, ज्या शिक्षकाच्या सेवा वीस ते पंचवीस वर्षापेक्षा अधिक झाली जे रिटायरमेंटच्या वाटेवर आहेत, अशांच्याही परीक्षा घेऊन काय साध्य होणार ? त्यातच विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या

अनेक योजना शासनाकडे त्यासाठी निधी नसल्याने त्या रखडल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. शाळा डिजिटल करण्यासाठी व भौतिक सुविधा निर्माण करण्यासाठी शासनाचा निधी अपूर्ण पडत आहे. असे असताना शिक्षकांसाठी परीक्षा घेण्यासाठी सरकार विनाकारण पैशाची उधळपट्टी का करत आहे. आणखीन एक विशेष बाब म्हणजे स्वयं मूल्यमापन परीक्षेमध्ये विज्ञान व गणितालाच प्राध्यान्य दिल्याचे समजते, माध्यमिक स्तरावरील विज्ञानावर आधारित प्रश्नही यामध्ये मोठ्या प्रमाणात असल्याचे समजते. जे शिक्षक प्राथमिक स्तरावर कार्यरत आहे त्यांना हे प्रश्न कसे सोडवणार, असाही एक प्रश्न उपस्थित करण्यात येते आहे. देशाच्या प्रगतीमध्ये शिक्षणाला मोठे महत्त्व आहे; परंतु गुणवत्तापुर्ण शिक्षण देण्याची जबाबदारी ही केवळ शिक्षकांचीच नव्हे तर ती संपूर्ण यंत्रणेची आहे. शिक्षणाचे ध्येयधोरण ठरवणारे लोकप्रतिनिधी मंत्री त्याची अंमलबजावणी करणारे अधिकारी वर्ग यांचीही तेवढीच जबाबदारी आहे. शिक्षकाची नेमणूक करताना त्याची शैक्षणिक पात्रता व गुणवत्ता परीक्षा घेऊनच त्यांची नेमणूक सक्षम अधिकारी वर्ग करत असतो ! मग प्रश्न असा उपस्थित होतो की एकदा त्या शिक्षकाची गुणवत्तेच्या आधारवर नियुक्ती करण्यात आली तेव्हा वारंवार त्याच्या स्वयं मूल्यमापन परीक्षा का घेण्यात येत आहेत ? स्वयं मूल्यमापन परीक्षा घ्यायची असेल तर मंत्र्यापासून शिक्षणसचिव, शिक्षण अधिकारी, गट शिक्षण अधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व संबंधित कार्यालयातील अधिकारी यांची पण स्वयं मूल्यमापन परीक्षा घेण्यात यावी. अलीकडे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांनी विधिमंडळात शिक्षण क्षेत्रातील शिक्षणाधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराबाबत गंभीर दखल घेऊन शिक्षण खात्यातील वाढत्या लाचखोरीला लगाम घालण्यासाठी भ्रष्ट अधिकाऱ्याविरुद्ध ईडीकडून कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. शिक्षणाचा खेळखंडोबा करण्यामध्ये शिक्षकापेक्षा भ्रष्ट शिक्षण अधिकाऱ्यांचा मोठा हातभार आहे.

शिक्षकांच्या नेमणुका, वैयक्तिक मान्यता, कार्यरत नसणाऱ्या शिक्षकांची शालार्थ प्रणालीमध्ये नाव घुसवणे, बोगस पडताळणी करणे, इत्यादी गैरप्रकारामुळे दरवर्षी शासनास कोट्यवधी रुपयांचा भुर्दंड सोसावा लागतो तो केवळ भ्रष्ट शिक्षण अधिकाऱ्यामुळे !

शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता असो की, शाळेची मान्यता असो, चुकीच्या पद्धतीने मान्यता देणे त्यानंतर त्या विरुद्ध तक्रारी होणे त्याबाबतीत न्यायालयीन प्रकरणे होणे ही अधिकाऱ्याच्या भ्रष्ट प्रवृत्तीमुळे होते. उच्च न्यायालयातील शाळासंदर्भाचे ज्या काही याचिका आहेत त्यातील ८० टक्के न्यायालयीन प्रकरणे केवळ शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांमुळे निर्माण होतात! त्यामुळे खासगी शाळेतील संस्थाचालक असो की शाळेतील कर्मचारी असो याचा बहुमोल वेळ व पैसा या कारणासाठी खर्च होतो आणि पर्यायाने शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. कायद्याप्रमाणे अशा दोषी अधिकाऱ्याविरुद्ध कारवाईची तरतूद आहे; परंतु वरिष्ठ अधिकारी व मंत्रीही देवाण– घेवाण करून अशा भ्रष्ट अधिकाऱ्याला पाठीशी घालतात. शासनाने अगोदर या अधिकाऱ्याविरुद्ध कारवाई करून वठणीवर आणावे. प्रामाणिकपणे काम करण्याचे त्यांना शिकवावे आणि नंतरच अशा मूल्यमापन परीक्षा शिक्षण क्षेत्रातील शिक्षकापासून ते सचिवापर्यंत घ्याव्या किंबहुना मंत्र्यापर्यंतही घ्याव्यात. त्यासाठी दरवर्षी इतर परीक्षेप्रमाणेही त्याचे वेळापत्रक ठरवावे त्याचे स्वागत करण्यात येईल व कोणतीही संघटना या परीक्षेपासून पळ काढणार नाही किंवा बहिष्कार टाकणार नाही.

केवळ शिक्षणच नव्हे आर्थिक, कृषी सामाजिक व इतर क्षेत्रातील प्रगतीसाठीही त्या त्या खात्यातील कर्मचारी अधिकारी व मंत्र्यांसाठी प्रेरणा परीक्षा किंबहुना स्वयं मूल्यमापन परीक्षा सुरू करण्यात याव्यात. काही वर्षांपूर्वी शासनातर्फे स्वतंत्र अशी विद्यार्थी पट पडताळणी मोहीम राबविण्यात आली होती. अशीच मोहीम सार्वजनिक बांधकाम विभाग, रस्ते विभाग, कृषी व महसूल अन्य विभागातही राबविली पाहिजे. 'एक देश एक संविधान' या संकल्पनेप्रमाणे केवळ शिक्षणावर म्हणजे शिक्षकावर नवनवे प्रयोग न करता ते सर्वच विभागाच्या कर्मचाऱ्यांवर करण्यात यावे, म्हणजेच देशाचा सर्वांगीण विकास होईल.

(देशोन्नती – १ ऑगस्ट २०२३)

प्रिय संजयजी,

‘शिक्षणाची शाळा’
आज सुखरूप मिळाली.

❖

शाळा चालली.
मजबूत आहे.

❖

आज करायलाच हवं असं तुमचं चिंतन शाळेत आहे.

❖

या तुमच्या शाळेनं मला एक नवा बौद्धिक कुटुंबीय दिला.

❖

मी आज आणखी नव्यानं समृद्ध झालो.

❖

या देखण्या निर्मितीसाठी निर्मलकुमारांना धन्यवाद!
त्यांना जयसंविधान सांगा!

❖

तुम्हाला मनापासून सदिच्छा, अभिनंदन!

तुमचा,
**यशवंत मनोहर**
१८एप्रिल२०२४

# प्रतिक्रिया

**जय** जिजाऊ
संजय टाकळगव्हाणकर सर,

मागच्या आठवड्यात 'शिक्षणाची शाळा' हा आपला शिक्षण क्षेत्राशी संबंधित व पूर्वप्रकाशित लेखांचा लेखसंग्रह मिळाला. खूप खूप अभिनंदन व आभार...

सर, भारतातील व महाराष्ट्रातील पीजी प्ले ग्रुप टू पीजी पोस्ट ग्रॅज्युएशन व अजून पलीकडील शिक्षणाचा दर्जा व सामाजिक तसेच शासकीय जबाबदारी यांचे आपण विश्लेषणात्मक मंथन करून काही निवडक उपाय सूचवलेले आहेत...

प्राचीन काळापासून भारतात सर्वत्र शिक्षणाचा प्रवास अतिशय खडतर राहिलेला आहे. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व अधिकार हा एक गुंता न सुटता वाढत आहे. शिक्षण, पालक म्हणजे समाज, विद्यार्थी, शिक्षक, भौतिक व अन्य सुविधा, शैक्षणिक दर्जा व प्रशासकीय, शासकीय यंत्रणा, शैक्षणिक धोरण यंत्रणा, अनुदानित व विनाअनुदानित शिक्षण संस्था, शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य इत्यादी सेवाशर्ती व इतर संबंधित बाबींचा विचार करून शिक्षणाची शाळा एकूण पंधरा लेखातून सत्याचा विपर्यास न करता मांडलेली आहे.

मनोगतात बराचसा उहापोह केला आहे...

महाराष्ट्रातील सामाजिक व आर्थिक चित्र आपल्यासमोर विषमतेचे लज्जास्पद उदाहरण आहे. एकच अभ्यासक्रम सर्वच पातळीवरील विद्यार्थ्यांना लागू आहे ? समाजातील एका मोठ्या वर्गातील पालक दरिद्री व निरक्षर आहेत. ते आपल्या पालकांच्या भविष्यासाठी व उत्तम दर्जेदार शिक्षणासाठी खूप चिंतीत असतात.

उपाशीपोटी राहून मुलांना शिकवतात. त्यांना घरातील वा परिसरातील जनावरे, कोंबड्यांची दुखणी यांची सुरक्षितता समजते. पण आपल्या लेकरांच्या शिक्षणासाठी काय करावे हेच उमगत नाही. ते पूर्णपणे व एकतर्फी शिक्षक व शाळा यावरच अवलंबून असतात.

आता तर ९९.९९% शिक्षक व शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी बहुजन समाजातील आहेत. परंतु अपवाद वगळता इतर सर्व शिक्षक-शिक्षिका पूर्णवेळ शाळेत जात नाहीत, आपल्या विषयात तज्ज्ञ नाहीत, गावात सामाजिक संबंध जोडत नाहीत, गावात राहत नाहीत, स्थानिक राजकारणात रस घेतात, प्लॉटिंग व इतर सावकारीचे धंदे करतात, विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील कला कौशल्याची माहिती देत नाहीत इत्यादी.

पैशाचा मोह व माज माणसाला सैतान बनवतो. शिक्षकांची उंची व समाजातील मानसन्मान स्थापित होण्यासाठी शिक्षकांनीच आत्मचिंतन व आत्मसंशोधन करणे आवश्यक आहे. शालेय वा महाविद्यालयीन पातळीवरील अभ्यासक्रम पूर्ण केला जात नाही. अभ्यासेत्तर उपक्रम राबविले जात नाहीत. शिक्षकांमार्फत संदर्भ पुस्तके चाळली जात नाहीत.

शिक्षण हे शिक्षकांच्या रोजगाराचे साधन मानले जात आहे. म्हणून तुम्हाला शिक्षणाची शाळा लिहून किमान एक तरी बाजू मांडण्याची गरज भासली...

आपण म्हणल्याप्रमाणे शिक्षण हा विषय अत्यंत गुंतागुंतीच्या समस्यात अडकलेला आहे ...

धन्यवाद व सदिच्छा...

**पुरुषोत्तम खेडेकर, चिखली.**
२७-४-२०२४

**संजय टाकळगव्हाणकर यांची प्रकाशित पुस्तके**

शिक्षण : विकासाकडून गुन्हेगारीकडे (१९९९)

कोरोना : मानवी गुलामगिरी चे नवे पर्व;
टाळेबंदी : पर्यावरण मुक्तीचा नवा मार्ग (२०२१), ई साहित्य ठाणे यांच्या वेबसाईटवर वैचारिक पुस्तकांमध्ये समावेश

हैदराबाद मुक्तिसंग्राम : हिंगोली जिल्ह्याचे योगदान (२०२३) या सुधारित आवृत्तीचे संपादन



संजय टाकळगव्हाणकर यांचा पिंड समाजशील आहे. अवतीभोवती घडणाऱ्या घटनांचे यथार्थ आकलन करून अन्वेषात्मक पद्धतीने त्याची मांडणी करणे, लोकजागर घडविणे आणि सत्याचे कथन हे काम ते अविरतपणे करित आहेत. यासह ते कृतिशील सुधारक आहेत. वंचित, पीडितांच्या वेदना हा त्यांच्या लेखनाचा केंद्रबिंदू आहे. गेली तीस वर्ष ते शिक्षण क्षेत्रात अध्यापनाचे कार्य करतात.

भारतीय शिक्षण पद्धतीचे, शिक्षण क्षेत्रातील धन दांडग्याच्या घुसखोरीतून होणारी पिळवणूक आणि त्यातून शिक्षणाचा होणारा ऱ्हास याचे मार्मिक विवेचन त्यांनी शिक्षणाची 'शाळा', या ग्रंथात केले आहे.

सरकारी शाळांमधील उदासीनता, अधिकाऱ्यांचा भ्रष्टपणा, राजकीय अनास्था या सर्व परिपाकातून उभी राहिलेली आजची शिक्षण व्यवस्था आणि तिचे ज्वलंत वास्तव त्यांनी या पुस्तकातील लेखांमधून मांडले आहे. हे जळजळीत वास्तव बऱ्याचदा प्रस्थापित व्यवस्थेला मानवणारे नाही परंतु एक जाणकार आणि सच्चा पत्रकार असलेल्या संजय टाकळगव्हाणकरची अस्वस्थता कधी बंडखोरीने तर कधी अगतिकपणे समग्र पुस्तकात उमटलेली दिसते. त्यांच्या या धाडसाचे कौतुकच करावे लागेल.

समाज गतिवादी झाला, विवेकवादी झाला तरच खऱ्या अर्थाने लोकशाहीची फळे चाखता येतील. म्हणून समग्र समृद्ध भारत उभा करण्यासाठी विवेकशील समाज निर्मिती गरजेची आहे. हेच त्यांच्या लेखनाचे सूत्र आहे. त्यांच्या या लेखन कार्यास माझ्या शुभेच्छा!

– डॉ. विलास ढवळे नांदेड